रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २१२
www.ramprahar.com

सोमवार, १७ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

तिहेरी तलाकविरोधात महाडमध्ये गुन्हा दाखल/२
इन्स्टाग्रामवर ब्लॅकमेल करून महिलेवर अत्याचार/६
पनवेल मनपा स्वच्छतादूतांची क्रिकेट स्पर्धा रंगली/८

## महाडमधील दौलतगडावर आढळली पुरातन गणेशमूर्ती



**महाड** : संकष्ट चतुर्थीच्या दिवशी महाड तालुक्यातील दासगाव येथील दौलतगडावर गणरायाची जवळपास सातशे वर्षांपूर्वीची एक पुरातन पाषाण मूर्ती आढळली असून ग्रामस्थांनी तिची विधीवत स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. दौलतगड प्रतिष्ठानच्या माध्यमातून दासगाव येथील दौलतगडावर साफसफाई करण्यासाठी गेलेल्या तरुणांना ही दीड फुटाची पाषाण गणेशमूर्ती आढळून आली. या मूर्तीची इतिहासतज्ज्ञ प्रा. अजय धनावडे यांनी पाहणी केली असता, साधारण १४व्या शतकातील शिलाहार राजे वंशातील शिल्पशैलीचा प्रभाव असलेली डाव्या सोंडेची ही चर्तुभुज पाषाणमूर्ती असून ग्रामस्थांच्या वतीने या गणेशमूर्तीची विधीवत स्थापना करणार असल्याचे सांगण्यात आले आहे.


नवख्या नेत्याला प्रदेशाध्यक्षपद

# काँग्रेसमध्ये चलबिचल

**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेसने माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती केल्यानंतर राज्यातील काँग्रेसमध्ये चलबिचल सुरू आहे. काँग्रेसमध्ये असलेल्या नेत्यांच्या तुलनेत नवख्या नेत्याकडे अध्यक्षपदाची धुरा सोपविल्यामुळे अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, पक्षाचे नेतृत्व करण्यासाठी माझ्याशी संपर्क साधला गेला होता, पण तरुण नेत्याकडे ही जबाबदारी देण्यात यावी, असे मी सांगितले, मात्र जेव्हा हर्षवर्धन सपकाळ यांच्या नावाची घोषणा झाली, तेव्हा मलाही आश्चर्य वाटले, कारण त्यांचे नाव चर्चेतही नव्हते.



काँग्रेसचे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष सतेज पाटील म्हणाले की, चार वर्ष हे पद सांभाळणे माझ्यासाठी कठीण होते. मी फार फार तर दोन वर्ष पद सांभाळू शकलो असतो. त्यामुळे मी माघार घेतली.

सांगलीचे आमदार विश्वजीत कदम म्हणाले, मुळात मी प्रदेशाध्यक्षपदाच्या शर्यतीतच नव्हतो. सपकाळ यांच्या निवडीचे कारण विचारले असता ते म्हणाले की, याचे कारण तुम्ही पक्षालाच विचारा.

हर्षवर्धन सपकाळ २०१४ ते २०१९पर्यंत बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार होते. याव्यतिरिक्त ते राज्यात फारसे सक्रिय दिसले नव्हते. माध्यमांशी बोलताना काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले, मागच्या पाच वर्षांत सपकाळ यांनी पक्षाची भूमिका मांडलेली ऐकिवात नाही. जेव्हा महाविकास आघाडीचे सरकार पडले, तेव्हाही पक्षाचे मनोबल उंचावण्यासाठी सपकाळ पुढे आले नाहीत.

# आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण उत्साहात

### १५,८९६ विद्यार्थ्यांचा सहभाग; लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक





**पनवेल : हरेश साठे**

कोशिश फाऊंडेशन आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व आंतरशालेय स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी (दि. १५) सायंकाळी पनवेल शहरातील फडके नाट्यगृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या स्पर्धेत १६ विद्यालयातील १५ हजार ८९६ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यातील बक्षीसपात्र विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी प्रमुख मान्यवर लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांनी विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस देत व त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देत भरभरून कौतुक केले.

पारितोषिक वितरण समारंभाला विद्यार्थी, पालक, विविध शाळांचे शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांसाठी 'आज्ञीबाई जोरात' या पहिल्या एआय महाबालनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना मनोरंजनाचाही आनंद मिळाला.

वक्तृत्व स्पर्धेतून सार्वजनिक भाषणकला आत्मविश्वास वाढवते, नेतृत्वगुण विकसित करते आणि भविष्यातील संधींना दिशा देते. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना व्यक्त होण्याची संधी मिळाली पाहिजे हाच उद्देश घेऊन कोशिश फाउंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी हा महत्त्वपूर्ण उपक्रम आयोजित केला. वक्तृत्व स्पर्धेत तब्बल १५,८९६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उदंड प्रतिसाद दिला

स्पर्धा इंट्रा क्लास राउंड, इंटर डिव्हिजन राउंड आणि महाअंतिम फेरी या तीन मुख्य टप्प्यांमध्ये पार पडली आणि त्यामधून विद्यार्थ्यांना आपली वक्तृत्व कला, आत्मविश्वास, विचारशक्ती आणि प्रभावी संवाद कौशल्य सादर करण्याची संधी मिळाली. १५,८९६ स्पर्धकांमधून अंतिम ११४ स्पर्धकांसाठी भव्य अंतिम फेरीत निवड झाली आणि यातून अंतिम ४५ विजेत्यांना तसेच शाळा व परीक्षकांना शनिवारी झालेल्या भव्य सोहळ्यात गौरविण्यात आले. (पान २ वर..)

### 'आज्ञीबाई जोरात'च्या प्रयोगातून शिक्षणासह मनोरंजनाची पर्वणी

'आज्ञीबाई जोरात' हे मराठी रंगभूमीवरील पहिले आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) वापरून साकारलेले महाबालनाट्य आहे. लेखक व दिग्दर्शक क्षितीज पटवर्धन यांची संकल्पना असलेल्या या नाटकात सुप्रसिद्ध अभिनेत्री निर्मिती सावंत, अभिनय बेर्डे, पुष्कर श्रोत्री, मुग्धा गोडबोले, जयवंत वाडकर यांसारख्या दिग्गज कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारली आहे. नाटकात एक आज्ञीबाई आपल्या नातवाला मोबाईल गेम्स व इंग्रजी माध्यमांच्या प्रभावापासून मराठी भाषेची गोडी लागावी म्हणून विविध क्लुप्त्या करते. नाटकात ॲनिमेशन, नृत्य, गाणी व जादूचा समावेश करून मुलांना मराठी संस्कृतीची ओळख करून दिली गेलीय. विशेषत्वाने नव्या तंत्रज्ञानाचा वापर केलेले हे विद्यार्थी व पालकांवर प्रकाश टाकणारे नाटक प्रेक्षकांना आकर्षित करणारे आहे. या नाटकाच्या आयोजनाबद्दल विद्यार्थी, विशेषत: पालकांनी कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांचे या वेळी आभार मानले.

# नवी दिल्ली रेल्वेस्थानकात चेंगराचेंगरी; १८ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नवी दिल्ली रेल्वेस्थानकावर शनिवारी (दि. १५) रात्री १०च्या सुमारास चेंगराचेंगरी झाली. यामध्ये महाकुंभमेळ्याला जाणाऱ्या १८ जणांचा मृत्यू झाला असून ३०हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

पोलिसांनुसार प्रयागराज एक्स्प्रेस आणि प्रयागराज स्पेशल या दोन ट्रेनच्या एकसारख्या नावामुळे प्रवाशांमध्ये गोंधळ झाला. प्रयागराज स्पेशल ट्रेन प्लॅटफॉर्म क्रमांक १६वर येण्याच्या घोषणेमुळे गोंधळ निर्माण झाला, कारण प्रयागराज एक्स्प्रेस प्लॅटफॉर्म क्रमांक १४वर उभी होती. ज्यांना प्लॅटफॉर्म १४वर पोहचता आले नाही त्यांना वाटले की त्यांची ट्रेन प्लॅटफॉर्म क्रमांक १६वर येत आहे. त्यामुळे चेंगराचेंगरी झाली, मात्र या दोन वेगवेगळ्या ट्रेन होत्या. दरम्यान, रेल्वे प्रशासनाने या दुर्घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

**नवी दिल्ली स्टेशनवर झालेल्या चेंगराचेंगरीमुळे मला वाईट वाटले आहे. ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्यांच्याबद्दल माझ्या संवेदना आहेत. जखमींना लवकर बरे होण्यासाठी मी प्रार्थना करतो. चेंगराचेंगरीमुळे बाधित झालेल्यांना अधिकारी मदत करीत आहेत.**
**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### रेल्वेकडून मदत जाहीर

भारतीय रेल्वेने चेंगराचेंगरीत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना १० लाख रुपये, गंभीर जखमींना २५ लाख रुपये आणि किरकोळ जखमींना एक लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

## महाराष्ट्रातील भाविकांचा युपीत अपघात; चौघांचा मृत्यू, १९ जण जखमी

**नांदेड : प्रतिनिधी**

प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यावरून अयोध्येकडे निघालेल्या भाविकांच्या टेम्पो ट्रॅव्हलरला झालेल्या भीषण अपघातात चार जणांचा मृत्यू, तर अन्य १९ जण जखमी झाले आहेत. ही घटना उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यात घडली. मयतांमध्ये नांदेड येथील तिघांचा, तर हिंगोली जिल्ह्यातील एका महिलेचा समावेश आहे.

प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यासाठी टेम्पो ट्रॅव्हलरने २३ जण रवाना झाले होते. तेथे स्नान करून हे सर्व भाविक अयोध्येकडे निघाले असता रविवारी (दि. १६) पहाटे ५.३०च्या सुमारास पूर्वांचल एक्सप्रेस वेवर उभ्या असलेल्या बसवर टेम्पो ट्रॅव्हलर जाऊन धडकली. या अपघातात सुनील दिगंबर वरपडे (५०), अनुसया दिगंबर वरपडे (८०), दीपक गणेश गोदले (४०) व जयश्री पुंडलिकराव चव्हाण (५०) यांचा मृत्यू झाला. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



**पुणे : लोकसभेच्या मावळ मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांना ६१व्या वाढदिवसानिमित्त पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी थेरगाव येथे जाऊन शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासमवेत भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे आदी उपस्थित होते.**

# २२ मार्चपासून आयपीएलचा थरार!

■ वेळापत्रक जाहीर; कोलकाता-बंगळुरू सलामीचा सामना

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) इंडियन प्रीमियर लीग २०२५चे वेळापत्रक रविवारी (दि. १६) जाहीर केले. पहिला सामना गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात ईडन गार्डन्सवर खेळला जाईल. या स्पर्धेचा १८वा हंगाम २२ मार्चपासून सुरू होईल, तर अंतिम सामना २५ मे रोजी ईडन गार्डन्सवर खेळला जाईल.

२३ मार्च रोजी आयपीएलचा मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यातील सामना खेळला जाईल. आयपीएलच्या १८व्या हंगामात ६५ दिवसांत १३ ठिकाणी एकूण ७४ सामने खेळवले जातील. यामध्ये नॉकआउट फेऱ्यांचाही समावेश आहे. या काळात २२ मार्च ते १८ मे या कालावधीत ७० लीग फेरीचे सामने खेळवले जातील. त्याचवेळी अंतिम सामन्यासह सर्व प्लेऑफ सामने २० ते २५ मेदरम्यान खेळवले जातील.

आयपीएल स्पर्धेत स्पर्धेचे उद्घाटन आणि अंतिम सामने गतविजेत्या संघाच्या घरच्या मैदानावर खेळवले जातात. या वेळी हे दोन्ही सामने कोलकात्यातील ईडन गार्डन्स स्टेडियमवर होणार आहेत. अंतिम सामना २५ मे रोजी होईल, क्वालिफायर-२देखील २३ मे रोजी कोलकाता येथे खेळवला जाईल. गेल्या हंगामातील उपविजेत्या संघ सनरायझर्स हैदराबादचे होम ग्राउंड असलेल्या राजीव गांधी स्टेडियमवर दोन प्लेऑफ सामनेदेखील होतील. येथे क्वालिफायर-१ हा २० मे रोजी आणि एलिमिनेटर २१ मे रोजी खेळवला जाईल.




### १३ ठिकाणी लढती

अहमदाबाद, मुंबई, चेन्नई, बंगळुरू, लखनौ, मुल्लानपूर (मोहाली), दिल्ली, जयपूर, कोलकाता, हैदराबाद ही १० संघांची होम ग्राउंड आहेत. याशिवाय, गुवाहाटी, विशाखापट्टणम आणि धर्मशाळा यासह एकूण १३ ठिकाणी सामने खेळवले जातील, तर सर्व डबल हेडर फक्त शनिवारी आणि रविवारी ५, ६, १२, १३, १९, २० आणि २७ एप्रिल रोजी दररोज दोन सामने होतील. ४, ११ आणि १८ मे रोजी डबल हेडर खेळवले जातील. सर्व डबल हेडर फक्त शनिवारी किंवा रविवारी होतील.



## मुंबईत इमारतीला आग; दोन महिलांचा मृत्यू, दोघे जखमी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील मस्जिद बंदर परिसरातील एका इमारतीला रविवारी (दि. १६) सकाळी लागलेल्या आगीत दोन महिलांचा मृत्यू आणि इतर दोन जण जखमी झाले आहेत. जखमींना जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

११ मजली पन्ना अली मॅन्शन या इमारतीच्या मीटर बॉक्समध्ये इलेक्ट्रीक वायरिंगला सकाळी सहाच्या सुमारास ही आग लागली. या आगीत पहिल्या मजल्यावरील साबीला खातून शेख (वय ४२) आणि साजीया आलम शेख (३०) यांचा दुखापत होऊन व गुदमरून मृत्यू झाला, तर इमारतीच्या सहाव्या मजल्यावर असलेल्या करीम शेख (२०) आणि शाहिन शेख (२२) जखमी झाले. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, ही आग नेमकी कशामुळे लागली याबद्दल माहिती मिळू शकली नाही.



# विकासामध्ये आर्थिक संस्थांचा मोलाचा वाटा -मुख्यमंत्री फडणवीस

**चंद्रपूर : प्रतिनिधी**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी दिली आहे. जेथे आर्थिक संस्था उभ्या राहतात, तेथे विकास भरभरून होतो. पंतप्रधान मोदी यांनी भारतातील प्रत्येक नागरिकाला बँकिंग क्षेत्रासोबत जोडले आहे. आज भारतातील प्रत्येक नागरिकाचे बँक खाते आहे. त्यामुळे एक डीजीटल ओळख निर्माण झाली आहे. त्याचा फायदा थेट नागरिकांना मिळत असून देशाच्या व सर्वसामान्य नागरिकांच्या विकासामध्ये आर्थिक संस्थांचा मोलाचा वाटा असतो, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेच्या रौप्य महोत्सवी सोहळ्यानिमित्त प्रियदर्शनी इंदिरा सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या वेळी मंचावर आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके, आमदार सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, किशोर जोरगेवार, कीर्तिकुमार भांगडीया, करण देवतळे, देवराव भोंगळे, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, माजी मंत्री व बँकेच्या संचालक शोभा फडणवीस, अध्यक्षा डॉ. रजनी हजारे, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल आदी उपस्थित होते.

सहकारी बँकेवर नागरिकांचा विश्वास असतो. या बँकेबद्दल सामान्य माणसाला आपुलकी असते. बँकेने सुद्धा दिलेले कर्ज शिस्तीमध्ये परत घेतले पाहिजे. आज ३०० कोटींची उलाढाल असलेल्या सन्मित्र बँकेचा एनपीए ०.५ टक्क्यांच्या खाली आहे, ही अतिशय उत्कृष्ट कामगिरी असून यासाठी सर्व संचालक मंडळ आणि कर्मचारी अभिनंदनास पात्र आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सहकार क्षेत्रामध्ये महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांनी अतिशय चांगली प्रगती केली आहे. व्यावसायिक बँकांसमोर सहकारी बँकेने आव्हान उभे केले आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात सहकारी बँका टिकतील का, असा प्रश्न उपस्थित होत असताना सन्मित्र सारख्या बँकांनी हे आव्हान चांगल्या पद्धतीने स्वीकारून यशस्वीपणे वाटचाल केली आहे. आज या बँकेने कोर बँकिंग, डिजिटल बँकिंग पद्धती स्वीकारली आहे. सन्मित्र बँकेने ग्राहकांच्या सुरक्षेचे विषय हाती घेतले आहेत. बँकांकडून नागरिकांना कर्ज दिली जातात. त्यामुळे नागरिक स्वतःच्या पायावर उभे राहून व्यवसाय करीत आहे. सन्मित्र बँकेने सुद्धा नागरिकांना कर्ज उपलब्ध करून दिले आहेत. त्यातून त्यांनी रोजगार उभा केला. त्यामुळे अर्थव्यवस्थेची चक्र चालण्यास मदत झाली. या बँकेने पुढील वाटचाल अधिक जोमाने करावी.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'लक्षलक्षिता' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला कर्मवीर मा.सां. कन्नमवार यांचे नाव दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. संचालन कीर्ति चांदे यांनी तर आभार माधवी तांबेकर यांनी मानले.

# आगरी समाजाच्या पिढीचा शैक्षणिक क्षेत्रात डंका -आमदार रविशेठ पाटील

**पेण : रामप्रहर वृत्त**

मागील कालखंडात जेमतेम दहावीपर्यंत शिकलेली मुलांची नव्या पिढीतील विद्यार्थ्यांनी दहावी बारावी इंजिनिअर डॉक्टर वाणिज्य क्षेत्रात दमदारपणे पाऊल टाकीत नव्वद टक्के पेक्षा जास्त गुण मिळवित स्पर्धेच्या युगात आगरी समाजाचा डंका कायम ठेवला आहे, असे प्रतिपादन आमदार रविशेठ पाटील यांनी केले. त्यांनी आगरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थी गुणगौरव व पारितोषिक वितरण समारंभात मनोगत व्यक्त केले.

शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेली आगरी समाजातील मध्यवर्ती संस्था आगरी शिक्षण संस्थेचा विद्यार्थी गुणगौरव समारंभ सोहळा आगरी समाज सभागृहात झाला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष विजयराव गावंड, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा नीलिमा पाटील संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड.जे.एल. म्हात्रे उपाध्यक्ष हरिभाऊ पाटील कोषाध्यक्ष ॲड. अच्युत पाटील, निवृत्त न्यायाधीश डी.पी.म्हात्रे, एन.आर पाटील, नगरसेवक शोमेर पेणकर गुणवंत २००विद्यार्थी, समाजबांधव पालकवर्गाची मोठी उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांचे गणेश पुजन व शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार प्रदान करण्यात आले. त्यानंतर अध्यक्ष विजयराव गावंड आणि ॲड.अच्युत पाटील यांनी मान्यवरांचे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आगरी समाजाच्या तब्बल अलिबाग पेण पनवेल उरण तालुक्यातील १५० विद्यार्थ्यांना पारितोषिके आमदार रविशेठ पाटील यांच्या व व्यासपिठावरील मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आली.

सूत्रसंचालन व प्रास्ताविक ॲड. अच्युत पाटील यांनी करून आगरी समाज शिक्षण संस्थेचा शैक्षणिक कार्याचा परिचय करून दिला १०१ वर्षाचा शैक्षणिक प्रवास पनवेल शहरातील शैक्षणिक संकुल पेणमध्ये वस्तीगृह आणि समाजातील नव्या पिढीतील विद्यार्थ्यांनी शिक्षणक्षेत्रात घेतलेली भरारी अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव गेली अनेक वर्ष केला जातो आहे. या वेळी नीलिमा पाटील यांनी ही विद्यार्थी वर्गाशी हितगुज साधून शुभेच्छा दिल्या.





**पुणे : खासदार श्रीरंग बारणे यांना वाढदिवसानिमित्त मावळ लोकसभा मतदारसंघातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी थेरगाव येथे जाऊन शुभेच्छा दिल्या.**

# घरफोडी करणाऱ्या अट्टल चोरास पेणमध्ये अटक

**पेण : प्रतिनिधी**

पेण पोलीस ठाणे हद्दीतील काश्मिरे गावात वारंवार चोरीचे गुन्हे घडत असल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. या चोरी करणाऱ्या अट्टल चोरट्यास पेण पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले आहे.

पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधिक्षक अभिजीत शिवधरे यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदिप बागुल यांच्या सूचनेनुसार गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी पोलीस सहाय्यक निरीक्षक समद बेग तसेच पोलीस पथकाकडून सखोल तपास करण्यात येऊन अट्टल घरफोडी करणाऱ्या चोरास अटक करण्यात यश आले आहे. आरोपी हरिश्चंद्र उर्फ गुड्डू बाळकृष्ण म्हात्रे गजाआड करण्यात आले आहे.



काश्मीरे-कांदळेपाडा येथील फिर्यादी संगिता खंडू पाटील (वय ४४) या शेतावर गेल्या असताना अज्ञात चोराने बाथरूमची खिडकी फोडून घरात शिरला. या चोरट्याने तीन लाख ७४ हजार ३०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घेत पसार झाला होता. पोलीस ठाण्यात संबंधित गुन्ह्याची तक्रार दाखल केल्यानंतर चोराच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले झाले आहे. आरोपीला पेण येथील न्यायालयात हजर करण्यात आले आहे. हरिश्चंद्र उर्फ गुड्डू बाळकृष्ण म्हात्रे असे आरोपीचे नाव असून पोलीसांनी आरोपीकडून ४५ हजार रूपये किमतीची १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जप्त केली आहे. संबंधित प्रकरणाच्या तपासाबाबत या अट्टल चोराने अधिक गुन्हे केले असल्याची शक्यता पोलिसांकडून वर्तवण्यात येत आहे.

दरम्यान, या प्रकरणावर सखोल तपास सुरू असून आरोपीचे इतर गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस प्रयत्नशील आहेत, असं पेण पोलीस यंत्रणेचे म्हणणे आहे. गुन्हयाचा प्राथमीक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक राजपुत तसेच प्रतीक पोकळे यांच्या कडून करण्यात आला असून अधिक तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# श्रीवर्धन स्मार्ट नगर परिषद होणार -मंत्री तटकरे

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन नगर परिषद लवकरच स्मार्ट नगर परिषद होण्याच्या मार्गावर असल्याचे प्रतिपादन महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे. नुकताच श्रीवर्धन शहरात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या प्रक्षेपणाचा लोकार्पण सोहळा झाला. त्यावेळी त्यांनी हे मत व्यक्त केले.



संपूर्ण कोकण किनारपट्टी वरती पालघर ते गोवा या ७५२ किलोमीटर लांबीच्या अंतरामध्ये फक्त श्रीवर्धन समुद्रकिनारी धुप प्रतिबंधक सुशोभीकरण केलेला बंधारा बांधण्यात आलेला आहे. या बंधाऱ्यावरती मच्छीमार बांधव, होडी, त्याचप्रमाणे खेकडा व कोळंबी यांच्या प्रतिकृती उभारण्यात आलेल्या आहेत.

तसेच सेल्फी पॉईंटदेखील बनविण्यात आले आहेत. धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरती विद्युत रोषणाई केलेली असून बसण्यासाठी सुशोभित अशी आसन व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे अनेक शोभेची झाडे देखील लावण्यात आलेली आहेत. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यासह संपूर्ण श्रीवर्धन शहर सीसीटीव्ही कक्षेच्या प्रक्षेपणात जोडले गेले आहे. सदर सीसीटीव्ही चा डिस्प्ले श्रीवर्धन नगरपरिषद व श्रीवर्धन पोलीस ठाणे या ठिकाणी ठेवण्यात आलेला आहे. श्रीवर्धन नगरपरिषदेला स्वच्छता अभियानात व माझी वसुंधरा अभियानात अनेक बक्षिसे प्राप्त झालेली असून श्रीवर्धन शहर नेहमीच स्वच्छ असल्याचे पाहायला मिळते.

श्रीवर्धन समुद्र किनारादेखील स्वच्छतेच्या बाबतीत अव्वल असून या ठिकाणी कचरा उचलण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांसह एक यांत्रिक गाडी देखील कचरा उचलण्याचे काम करत असते. श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावरती पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जीव रक्षकांची नेमणूक देखील नगरपरिषदे तर्फे करण्यात आलेली आहे. श्रीवर्धन शहरातील कचरा उचलण्यासाठी नगर परिषदेच्या घंटागाड्या सकाळ, संध्याकाळ श्रीवर्धन शहरामध्ये घरोघरी फिरून कचरा उचलण्याचे काम करत असतात. त्यामुळे श्रीवर्धन शहर हे नेहमीच स्वच्छ असल्याचे व सुंदर दिसत असल्याचे येणाऱ्या पर्यटकांना व नागरिकांना देखील जाणवते.

दर शनिवारी व रविवारी सायंकाळी श्रीवर्धन समुद्रकिनारी हिंदी व मराठी गाण्यांच्या वाद्य वृंदाचा कार्यक्रमदेखील आयोजित करण्यात येत असतो. श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीमध्ये सांडपाण्याची व्यवस्था देखील उत्तम प्रकारे करण्यात आलेली असून रस्त्यावर किंवा अन्य कोणत्याही ठिकाणी सांडपाणी साचलेले आढळून येत नाही. शहरामध्ये नारळ, सुपारीच्या वाड्या असल्यामुळे डासांचे प्रमाण थोड्या अधिक प्रमाणात असते. परंतु नगर परिषदेकडून ते कमी करण्यासाठी कीटकनाशक फवारणी नियमित प्रमाणे करण्यात येते. श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सर्व जलवाहिन्या मागील वर्षी नवीन टाकण्यात आलेल्या आहेत. तसेच जलशुद्धीकरण प्रकल्प देखील कार्यान्वित करण्यात आलेला आहे. त्यामुळे श्रीवर्धन शहरात येणाऱ्या पर्यटकांना व स्थानिक नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध होत आहे.

श्रीवर्धन शहरातून उचलण्यात येणाऱ्या कचऱ्यापासून खत निर्मिती करण्यात येत आहे. भविष्यात श्रीवर्धन या ठिकाणी तारांगणदेखील उभारण्याची घोषणा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केली आहे. तसेच श्रीवर्धन बाजारपेठ येथे असलेल्या जुनी तहसील कार्यालयाची इमारत पाडून त्या ठिकाणी मोठा अश्वारुढ शिवाजी महाराजांचा पुतळा उभारून शिवसृष्टी निर्माण करण्यात येणार आहे. या सर्व सुविधांमुळे व सोयींमुळे लवकरच श्रीवर्धन शहर हे स्मार्ट नगर परिषद म्हणून अस्तित्वात येईल. यामध्ये कोणतीही शंका नाही.

# तिहेरी तलाकविरोधात महाडमध्ये गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील बिरवाडी गावातील एका मुस्लिम विवाहित महिलेने शारीरिक व मानसिक छळ करुन बेकायदेशीर तिनतलाक दिल्याप्रकरणी पती व सासरच्यां विरोधात महाड औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून आरोपीविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी महाड औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जीवन माने यांनी दिलेल्या माहितीनुसार तक्रार विवाहित मुस्लिम महिला (वय २४, रा. वहूर, मुळ गाव बिरवाडी) हिचे वहुर येथील अब्दुल रेहमान नदीम ईसाने (वय ३२) यांच्याशी २०२२ साली मुस्लिम रितीरिवाज प्रमाणे विवाह झाला होता, मात्र दरम्यान तक्रादार महिला यांना पती व सासरच्यां कडून आर्थिक पिळवणूक व मानसिक शारीरिक त्रास दिला जात होता. तसेच एके दिवशी मारहाण करीत बेकायदेशीर तिनतलाक देऊन घरातून बाहेर काढले प्रकरणी १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी तक्रार दाखल केली आहे.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपी अब्दुल रेहमान नदीम ईसाने (वय ३२), नदीम ईसाने (वय ५५), निलोफर नदीम ईसाने (वय ५०), सलीम इसाने (वय ४८), फिरदोस उर्फ गोमा जाकीर इसाने (वय ५०) सर्व रा. वहूर ईसाने मोहल्ला ता. महाड जि. रायगड यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला असुन आरोपी सध्या फरार झाले असुन पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

# व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत ओंकार पवार प्रथम

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील शाळा वडगाव येथे झालेल्या जिल्हास्तरीय क्रिडा व व्यक्तीमत्व विकास स्पर्धेत मोठ्या गटात व्यक्तिमत्व विकास स्पर्धेतर्गत मातीचे शिल्पकाम मोराची प्रतिकृती वावंढळ शाळेचा विद्यार्थी ओंकार संतोष पवार यांनी बनविली होती.

जिल्हा क्रीडा निवड समितीने त्याची जिल्ह्यात प्रथम क्रमांकाची निवडा केल्याने कुमार ओंकार याला जिल्ह्यातील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यातील शाळांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. शाळेच्या



मुख्याध्यापिका योगिता सिद्धेश्वर पाटील यांनी प्रोत्साहन दिले तर मार्गदर्शन शिक्षक योगेश खोत, अनिल गाडगे, भाग्यश्री हजारे यांनी केले.

पान १ वरुन

## आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व आंतरशालेय स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

या सोहळ्याला प्रमुख मान्यवर म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजपचे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर चारुशीला घरत, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, सुप्रसिद्ध अभिनेते जयवंत वाडकर, माजी स्थायी समिती सभापती मनोहर म्हात्रे, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, महापालिकेचे शिक्षण अधिकारी रमेश चव्हाण, भाजपचे जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, स्पर्धा प्रमुख व मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, कामोठे युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, अक्षय सिंग, कोशिश फाऊंडेशनचे सचिव ॲड. चेतन जाधव, खजिनदार अभिजित जाधव, सदस्य सत्यवान नाईक, प्रीतम म्हात्रे, गणेश जगताप, स्पर्धा समन्वयक अयुफ अकुला आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या मनोगतातून सर्व विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले. पाल्यामध्ये सभाधीटपणा येण्यासाठी पालकांचे प्रोत्साहन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. पनवेल परिसराला मोठे भवितव्य आहे आणि युवा पिढी घडविण्यासाठी वक्तृत्व विकास महत्त्वाचा असतो. त्या अनुषंगाने या कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला पंख देण्याचे काम होत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी सांगितले की, कोशिश फाऊंडेशन स्थापन करताना युवावर्गाचा व्यक्तिमत्व विकास तसेच समाजोपयोगी कार्य करणे व विविध उपक्रम राबविण्याचा दृष्टिकोन ठेवण्यात आला. त्या अनुषंगाने वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, फोटोग्राफी स्पर्धा, सूर्यनमस्कार स्पर्धा, ध्वनी प्रदूषणाचा विचार करून 'ये दिवाली शांतिवाली', घरगुती पर्यावरणपूरक गणपती सजावट स्पर्धा यांसारख्या स्पर्धांचे आयोजन नियमितपणे करण्यात येत आहे. गायकांना व्यासपीठ मिळावे याकरिता पनवेल शहरातील प्रसिद्ध वडाळे तलाव या ठिकाणी सूर पनवेलचा कार्यक्रमांतर्गत मैफिल भरवली गेली असून विद्यार्थीवर्गाला शिक्षणाबरोबरच विविध कलागुणांचा विकास करता आला पाहिजे यासाठी यापुढेही असे विविध उपक्रम आणि प्रकल्प राबविले जातील, असेही परेश ठाकूर यांनी नमूद केले.

विद्यार्थी अभिव्यक्त झाला तर त्याच्या आयुष्याला दिशा मिळते. त्यामुळे शेवटच्या बाकावरील विद्यार्थीही बोलता झाला पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला चालना मिळाली पाहिजे यासाठी कोशिश फाऊंडेशनचा हा उपक्रम महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन शिक्षण अधिकारी रमेश चव्हाण यांनी केले. या सोहळ्याचे प्रास्ताविक मयुरेश नेतकर, तर सूत्रसंचालन वैभव बुवा यांनी केले.

आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेतील विजेते

**इयत्ता दहावी गट (मराठी)** : प्रथम क्रमांक समृद्धी श्रीकांत मोरे, द्वितीय श्रेया अनिल सोलणे, तृतीय यथार्थ संदीप दुबे; **इयत्ता नववी गट (मराठी)** : प्रथम सुकन्या रवीकरण पायघन, द्वितीय अनुष्का संतोष गिड्डे, तृतीय आदित्य नागेश तरडे; **इयत्ता आठवी गट (मराठी)** : प्रथम वेदांत नितीन शिंदे, द्वितीय आर्या जनार्दन मोरे, तृतीय मानव मधू मंगल; **इयत्ता सातवी गट (मराठी)** : प्रथम अधिराज विनोद गाडे, द्वितीय अमृता भारत ढोले, तृतीय गार्गी मिताली म्हात्रे.

**इयत्ता दहावी गट (इंग्रजी)** : प्रथम क्रमांक श्रावणी रिकामे, द्वितीय श्रेया बुकटे, तृतीय कनिश म्हात्रे; **इयत्ता नववी गट (इंग्रजी)** : प्रथम आर्या निलेश तेलगे, द्वितीय राशी विनोद गुप्ता, तृतीय अनित्य राजू संगीता; **इयत्ता आठवी गट (इंग्रजी)** : प्रथम मान्यता अनुमोले, द्वितीय लावण्या सोनावणे, तृतीय दर्शन नरवडे; **इयत्ता सातवी गट (इंग्रजी)** : प्रथम ऋतुजा आप्पासाहेब चव्हाण, द्वितीय निर्मयी संदीप फुलसुंदर, तृतीय हृदयांश निलेश अब्बीराव.

**महापालिका शाळा इयत्ता पहिली गट** : प्रथम क्रमांक फातिमा इनामदार, द्वितीय सावली पाटील, तृतीय आर्यन ताज; इयत्ता दुसरी गट : प्रथम खादीजा खान, द्वितीय साजिदा शेख, तृतीय कुसुम राजपुरोहित; **इयत्ता तिसरी गट** : प्रथम मेघना, द्वितीय अनुष्का प्रजापती, तृतीय कालसा कोळी; **इयत्ता चौथी गट** : प्रथम आनंद परमार, द्वितीय कीर्ती चक्रदिय, तृतीय सिद्रा सय्यद; **इयत्ता पाचवी गट** : प्रथम आसावरी लाड, द्वितीय दुर्वा मांडवकर, तृतीय डॉली यादव; **इयत्ता सहावी गट** : प्रथम महेंद्र कोळी, द्वितीय स्वरा भोईर, तृतीय पारस लुहा; **इयत्ता सातवी गट** : प्रथम देवराज कालसगेरा, द्वितीय प्रियांशी पवार, तृतीय फलकिन्शा अन्सारी.

## निवडक

### कळंबोलीतून रिक्षाची चोरी

**पनवेल :** कळंबोली वसाहती मधून रिक्षाची चोरी झाल्याची घटना घडल्याने रिक्षा चालकांमध्ये भीतीयुक्त वातावरण आहे. पनवेल शहरातील जुने पोस्ट ऑफिस परिसरात संतोष दाबके यांनी त्यांची रिक्षा उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर रिक्षा चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तर दुसऱ्या घटनेत केशव टाकरस यांनी त्यांची रिक्षा कळंबोली बस डेपो जवळील रिक्षा स्टँडच्या बाजूला उभी करून ठेवली असता अज्ञात चोरटयाने सदर रिक्षा चोरून नेल्याने याबाबतची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह नव्याने होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या बाजूला असलेल्या खाडीमध्ये आढळला असून त्याच्या नातेवाईकाचा शोध पनवेल शहर पोलीस करत आहे. अनोळखी बेवारस व्यक्तीचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे, डोक्याचे केस काळे, डोळे उघडे व फुगलेले, तोंड उघडे असुन जीभ फुगीर बाहेर आलेली आहे. तर मिशी व दाढी वाढलेली असून अंगात काळी पॅन्ट आहे. तसेच त्याची उंची अंदाजे पाच फुट चार इंच आहे. या व्यक्तीबाबत माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (८५९१४२४३५०) किंवा पोलीस उपनिरीक्षक सचिन वायकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वलप, फणसवाडी येथे १२,५०० वृक्षांची लागवड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्री समर्थ सांप्रदायाच्या वतीने खालापूर, पनवेल तालुक्यातील श्री सेवा दास्यभक्ती श्री समर्थ बैठकीच्या वतीने वळप फणसवाडी येथील डोंगरावर १२,५०० विविध जातीच्या वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

या वृक्षांचे जतन, संवर्धन व्हावे यासाठी समर्थ सांप्रदायाच्या वतीने रविवारी (दि.१६) हातात फावडे, कुदळ, कोयता, विला पान्याचे ड्रम घेऊन शेकडो सदस्य फणसवाडी डोंगरावर पहावयास मिळाले. या वेळी जांभूळ, पेरू, वड, आंबा, बदाम, उंबर, शिसव, कडुलिंब, चिंच, कांचन, पिंपळ, आशी, करंज, भेंड, गुलमोहर, काजू, कुडा, सिताफळ, सप्तकर्णी, जाफल, हिरडा, सावर आदी ११४ जातीच्या वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

या वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी खालापूर, पनवेल तालुक्यातील श्री सदस्य हजर होते. कोणी वृक्षाभोवती आल्या करत, कोणी गवत कापत, शेणखत टाकत तर कोणी पाणी आणून वृक्षांच्या बुंध्यावर टाकत, तर कोणी वृक्षाला आधार देण्यासाठी कुंपण करत असे दृष्य पहावयास मिळाले. या डोंगरावरील १२५०० वृक्षांना नंबर देण्यात आले असून वळप फणसवाडी डोंगर हिरवेगार करण्याचा श्री सदस्यांचा संकल्प आहे. डोंगरावरील या वृक्षांचे श्री समर्थ बैठक मोहोपाडा यांना वृक्ष क्र.१०७४४ ते १०७९७ यातील ५४ वृक्षांची जबाबदारी देण्यात आली असून आम्ही श्री समर्थ दासभक्त सर्व वृक्षांची व्यवस्थित काळजी घेवून वृक्षसंवर्धन करू, असे दासभक्तांनी सागितले.



# आमदार प्रशांत ठाकूर यांचा नागरी सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण दर्पणच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात पनवेल मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

कोकण दर्पणचा १४ वर्धापन दिन आयोजीत करण्यात आला होता. हा सोहळा शनिवारी पनवेल शहरातील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजीत करण्यात आला होता. वर्धापन दिनाचे औचित्यसाधून राज्य स्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांचा उपस्थित मान्यवरांच्याहस्ते नागरी सत्कार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचाही पुरस्कार देऊन त्यांना सन्मानीत करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, किरण पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



## शिवजयंतीनिमित्त भाजपतर्फे वेशभूषा स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी प्रभाग क्रमांक १९ च्या वतीने बुधवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती शोभायात्रा निमित्त मराठा वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धा १५ वर्षांखालील मुलामुलींसाठी असून स्पर्धेला शहरातील गावदेवी मंदिरापासून सकाळी ७. ३० वाजता सुरुवात होणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १७ फेब्रुवारी पर्यंत नोंदणी करता येणार असून अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी मयुरेश नेतकर ९८२१५३१५४७, सुमित झुंझारराव ९८३३३४९१९७, देवांशू प्रभाळे ८४३३५१३५४० किंवा प्रशांत शेट्ये ९३२४७१७१११ यांच्याशी संपर्क करावा. या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

## शिवजयंतीनिमित्त 'स्पर्धा गोष्टींची'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवजयंतीनिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप सांस्कृतिक सेल पनवेलतर्फे 'स्पर्धा गोष्टींची' या ऑनलाईन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

शालेय, महाविद्यालयीन आणि खुला गटात वय २५ ते ४५ वर्षे आणि ४५ वर्षेपुढील अशा गटात हि स्पर्धा होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे आयुष्य, कर्तृत्व, नेतृत्व, दातृत्व, त्यांचे बालपण किंवा महाराजांच्या आयुष्यातील प्रसंग यापैकी एक विषय स्पर्धकांसाठी असणार आहे. हि स्पर्धा ऑनलाईन असून त्यासाठी पाच मिनिटांची वेळ मर्यादा असणार आहे. त्या अनुषंगाने व्हिडिओमध्ये कोणतेही एडिटिंग चालणार नाही. व्हिडीओ पाठवण्याची अंतिम तारीख २३ फेब्रुवारी असून परीक्षण हे सादरीकरण, विषयातील स्पष्टता, चेहऱ्यावरील हाव भाव, उच्चारातील स्पष्टता या निकषांवर केले जाणार आहे.

bjpculturalpanvel@gmail.com या ईमेल आयडीवर व्हिडीओ पाठवाव्यात. विजेत्यांना गट निहाय बक्षिसे देण्यात येणार असून प्रथम क्रमांकास तीन हजार, द्वितीय क्रमांकास दोन हजार, तृतीय क्रमांकाला एक हजार, तर दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी ५०० रुपये आणि सर्व विजेत्यांना प्रमाणपत्र आणि चषक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. अधिक पाटील ९०८२४०७०८८ किंवा वैभव बुवा ९०२९४१०६९९ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




**पनवेल : श्री संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त कळंबोली, तोंडरे आणि खेरणेमध्ये धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत संत सेवालाल महाराजांचे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अतुल भगत, खेरणेचे सरपंच शैलेश माळी, भाजप युवा नेते महेश पाटील, राजेंद्र गोंधळी, संजय गोंधळी, संदेश भोईर, प्रदीप माळी, संदीप माळी, श्रीनाथ पाटील, अशोक साळुंखे, अतुल पाटील, संदीप पाटील, रमेश राठोड, नितीन राठोड आदी उपस्थित होते.**




**पनवेल : श्री विघ्नहर्ता महिला मंडळ, टेंभोडे यांच्या वतीने श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली होती. यानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत पूजचे दर्शन घेतले. आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस तथा माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील यांच्यासह पदाधिकारी, भाविक, महिलावर्ग उपस्थित होता.**



**पनवेल : भाजपचे खारघर शहर उपाध्यक्ष संजय राजाराम घरत यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.**

## करंजाडे येथे गार्डनच्या कामाचे भूमिपूजन

### अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार यांचा वाढदिवस रविवारी (दि.१६) विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून करंजाडे सेक्टर ४मध्ये नव्याने बांधण्यात येणाऱ्या गार्डनच्या कामाचा भुमीपूजन सोहळा आयोजीत करण्यात आला होत. या कामाचा शुभारंभ भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते रविवारी झाले.



या भूमिपूजनावेळी भाजप नेते कर्णा शेलार, भाजपचे तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, जिल्हा चिटणीस रूपेश धुमाळ, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, संदेश पाटील, निनाद मुंबईकर, सुषमा मयेकर, नंदकुमार भोईर, बिपीन गायकवाड, सुदीन पाटील, संतोष विखारे, विनोद सीरवी, तानाजी शेलार, प्रवीण मोहोकर, सत्यजित पाटील, प्रिया फडके यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी उपस्थित मान्यवरांनी मंगेश शेलार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान, वाढदिवसाचे औचित्यसाधून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून याला नागरीकांचा चांगला प्रतिसाद लाभला.

## आज चावणे ते सवणे रस्ता डांबरीकरणाचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चावणे ते सवणे रस्ताच्या डांबरीकरणाचे भूमिपूजन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते सोमवारी (दि.१७) सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आले आहे.

सवणे गाव येथे हा सोहळा होणार असून या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, माजी पंचायत समिती सदस्या तनुजा टेंबे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे निमंत्रक भगवान भाऊ देशमुख आहेत.

## महागणपतीच्या दर्शनासाठी गर्दी

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील श्री महागणपती हा भक्तांच्या नवसाला पावणारा असल्याने, संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने रविवारी (दि.१६) हजारोंच्या संख्येने आलेल्या भाविकांनी प्राचीन जागृत श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटे चार वाजता मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले.

या वेळी प्रथम श्री महागणपतीची महापूजा झाली. त्यानंतर मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाचा जयघोष करीत भक्तीमय वातावरणात दर्शन घेतले. यावेळी मंदिरात दिवसभर भजनांचा सूर ऐकायला मिळाला. श्री महागणपतीचे देवस्थान अत्यंत पुरातन असून, पेशवेकालीन भव्य मंदिरात श्री महागणपती विराजमान आहेत. पद्मासनात बसलेली श्री महागणपतीची मूर्ती सुमारे सहा फूट उंच व साडेतीन फूट रुंद आहे. शेंदूर चर्चित मूर्ती चतुर्भुज असून, पूर्वाभिमुख आहे. ही मूर्ती तळ्यात सापडली.



या गणरायाच्या दर्शनासाठी भाविकांची नेहमीच गर्दी असते, मात्र रविवारच्या सुट्टीच्या दिवशी संकष्टी चतुर्थीचा योग आल्याने, नवी मुंबई, ठाणे, उरण, पनवेल, पेण, डोंबिवली परिसरातील हजारो गणेश भक्तांनी दर्शनासाठी पहाटेपासूनच गर्दी केली होती. भाविकांना रांगेत सुरळीत दर्शन मिळावे, यासाठी चिरनेर गणपती देवस्थानच्या वतीने चौख व्यवस्था ठेवण्यात आली होती.

# कामोठे येथे संत शिरोमणी सेवालाल महाराज जयंती उत्साहात

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथे श्री संत शिरोमणी सेवालाल महाराज यांची१८६वी जयंती सुषमा पाटील विद्यालय सेक्टर ११ येथे जय सेवा वसंत बंजारा सामाजिक संस्था, गोर सेवा महिला मंडळ आणि सेवालाल ग्रूप कामोठे यांच्या विद्यमाने मिरवणूक काढून झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुनील आडे यांनी केले. प्रमुख पाहुणे वसंतराव मनोहरराव नाईक, पनवेल कामोठे पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ बडवे, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, एस के राठोड, विशाल राठोड, गुलाबराव चव्हाण, सुभाष आडे, गौरव पोरवाल, शुभांगी खरात, अनिल पवार, छगन राठोड, दिनकर राठोड यांच्या व कामोठे वासीयाच्या उपस्थितीमध्ये भोग व आरतीने सुरुवात करण्यात आली.

मिलिंद पवार, हर्षवर्धन पाटील, मंगेश आढाव यांनी भाषणामध्ये श्री संत सेवालाल महाराज यांचे जीवन देशासाठी नव्हे जगासाठी अठराव्या



दशकातील सामाजिक, धार्मिक भौगोलिक अध्यात्मिक विज्ञानवादी कसे होते. त्यांचे महत्त्व त्यांनी सांगितलेले विचार आजच्या घडीला तंतोतंत खरे होताना दिसतात म्हणून ते युगपुरुष होते. बंजारा समाजासाठी व सर्वांसाठी कसे उपयुक्त आहे याचे महत्त्व पटवून दिले.

वरिष्ठ व सामाजिक व राजकीय मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. यावर्षीचा उल्लेखनीय क्षेत्रातील कामगिरी. बंजारा भूषण पुरस्कार डॉ. संतोष चव्हाण यांना त्यांच्या सर्व कुटुंबाच्या उपस्थितीत संस्थेच्या वतीने प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता सर्वांचे आभार मानून डॉ. अमित राठोड यांनी केलेल्या अन्नदणाने करण्यात आले.

कार्यक्रमासाठी रमेश भाऊ, संजय पवार, गजेंद्र राठोड, खुशाल राठोड, मंगेश चव्हाण, विजय चव्हाण, विजय राठोड भीम चव्हाण, श्याम राठोड, माणिक जाधव, राजू चव्हाण, विशाल राठोड यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय

# लव्ह जिहादविरोधात पाऊल

महाराष्ट्रात आंतरधर्मीय विवाहाच्या माध्यमातून उघडकीस येणाऱ्या लव्ह जिहादच्या घटनांना आळा घालण्यासाठी राज्य सरकार आता लव्ह जिहादविरोधी कायदा आणणार आहे. यासाठी पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे.

**राज्यात गेल्या काही वर्षांत हिंदू-मुस्लिम आंतरधर्मीय विवाहावरून लव्ह जिहादच्या घटना उघडकीस आल्या आहेत. मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढत त्यांच्याशी विवाह करून त्यांचे बळजबरीने धर्मांतर करण्यासह आंतरधर्मीय विवाहाच्या माध्यमातून लव्ह जिहादच्या घटना वाढत चालल्या जात आहेत. अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी कठोर कायदा करण्याची मागणी नागरिकांकडून विशेषतः हिंदुत्ववादी संघटनाकडून होत होती. दोन वर्षांपूर्वी विधानसभागृहात मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी लव्ह जिहाद प्रकरणाची आकडेवारीच सादर केली होती. देशात आतापर्यंत उत्तर प्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, गुजरात, झारखंड, मध्य प्रदेश, उत्तराखंड, ओडिशा आणि छत्तीसगड या नऊ राज्यांनी लव्ह जिहादविरोधी कायदा केला आहे. या धर्तीवर महाराष्ट्रातही लव्ह जिहाद कायदा लागू करण्याची मागणी नेते आणि संघटनांनी केली होती. राज्यातील धर्मांतराच्या तक्रारीनंतर या विरोधात कायदा करण्याची ग्वाही तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली होती. लव्ह जिहादच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर आता मुख्यमंत्री बनलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकार लव्ह जिहादविरोधी कायदा आणणार आहे. या पार्श्वभूमीवर गृह विभागाने अन्य राज्यांनी केलेल्या लव्ह जिहादविरोधी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती गठित केली आहे. गृह विभागाने या संदर्भातील शासन निर्णयही जारी केलाय. ही समिती इतर राज्यांनी लव्ह जिहादविरोधी तसेच सक्तीच्या अथवा फसवणूक करून केलेल्या धर्मांतराविरोधात केलेल्या कायद्याचा अभ्यास करून राज्यातील कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी सरकारला शिफारस करणार आहे. त्यामुळे लव्ह जिहादच्या विरोधात कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील दहावे राज्य ठरणार आहे. याबद्दल कॅबिनेट मंत्री व मुंबई उपनगरचे सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी राज्य सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. महायुती सरकारच्या पहिल्या कार्यकाळात महिला व बालविकास विभागाची जबाबदारी असताना लोढा यांनी आंतरधर्मीय विवाह समन्वय समिती गठीत केली होती. आता नव्या समितीच्या माध्यमातून अशा प्रकारच्या घटनांना समोर आणण्यासाठी काम करण्यास मदत होईल. लव्ह जिहाद ही एक मोठी समस्या असून अशा प्रकारच्या तक्रारी रोखण्यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून काम केले जात आहे. लव्ह जिहाद प्रकरणे रोखण्यासाठी काम करणारी समिती महिला व संस्कृती रक्षणासाठी काम करेल, असे मत लोढा यांनी व्यक्त केले आहे. पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या या समितीत महिला आणि बालविकास, अल्पसंख्याक विकास, विधी आणि न्याय, सामाजिक न्याय विभागाचे अतिरिक्त प्रधान सचिव, प्रधान सचिव, सचिव तसेच गृह विभागाच्या विधी शाखेचे सहसचिव किंवा उपसचिव हे या समितीचे सदस्य असतील, तर गृह विभागाचे सहसचिव अथवा उपसचिव सदस्य सचिव असणार आहेत. एकूणच लव्ह जिहादविरोधात पाऊल पडले आहे.**

# आंगणेवाडीची आई भराडीदेवीची यात्रा

**खबरबात**
विजय मांडे

कोकणी माणूस हा उत्सवप्रेमी असून सर्व सण व उत्सव येथे मोठ्या थाटामाटात साजरे केले जातात. कोकणी माणूस कुठेही असला तरी शिमगा (होळी), गणपती, दसरा, दिवाळी या उत्सवासाठी तो आपली हजेरी कोकणात आवर्जून लावत असतो. या सण-उत्सवांप्रमाणेच कोकणातील, गावोगावच्या यात्रांनाही तो आपली उपस्थिती लावतो. आंगणेवाडी येथील आई भराडी देवीच्या यात्रेलाही कोकणी माणूस असेल तेथून आपल्या कुटुंब कबिल्यासह मातेचे दर्शन घेण्यासाठी दोन दिवस आधीच कोकणात येत असतात. अगदी मंत्र्यांपासून ते साध्या ग्रामपंचायत सदस्यांपर्यंतचे राजकारणीसुध्दा आपली हजेरी लावत असतात. यंदा ही यात्रा २२ फेब्रुवारीला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण तालुक्यापासून १५ किमीवर मसुरे गाव असून त्यातील आंगणे ग्रामस्थांची एक वाडी आहे. त्या ठिकाणी हे देवीचे स्थान असून ते भरडावर (माळरानावर) असल्यामुळे तसेच देवालयांचे माहेरघर असलेल्या मसुरे गावातील प्रसिद्ध देवालय म्हणजे आंगणेवाडी येथील श्री भराडी देवी. आंगणेवाडीची देवी भराडी देवी ही राज्यभरातच नव्हे, तर देशभरात नवसाला पावणारी देवी म्हणून तिची ख्याती आहे. मसुरे गावची एक वाडी असलेल्या आंगणेवाडीची महती सातासमुद्रापार पोहचली आहे. ती आई भराडी देवीमुळेच. भक्तांच्या हाकेला 'ओ' देऊन संकटाला धावून जाणारी देवी भराडीने संपूर्ण मसुरे गाव परिसर पावन केला आहे.

या देवीबाबत अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. भरडावर देवी प्रकटली म्हणून तिला भराडी देवी असे म्हटले जाते. दुसऱ्या एका आख्यायिकेनुसार देवी तांदळाच्या वड्यातून भरड माळावर प्रकटली असेही सांगितले जाते. ही देवी तांदळाच्या वड्यातून भरडावर प्रकटली म्हणूनच आजही आंगणे मंडळी गावात आलेल्या भाविकांना प्रसाद म्हणून तांदळाचे वडे देतात व तेथेच खायला सांगतात. भराडी देवीची जत्रा कधी सुरू झाली हे निश्चित सांगता येत नसले तरी साधारणपणे तीनशे वर्षांपूर्वी येथे पूजा - अर्चा सुरू असल्याचं सांगितलं जातं. श्रीभराडी देवीच्या महात्म्यामुळे आंगणेवाडीला हे महत्व प्राप्त झालेले आहे. पुण्याचे पेशवे श्रीमंत चिमाजी अप्पांनाही मोहिमेमध्ये भराडीदेवीचा कृपाशीर्वाद लाभल्यामुळे त्यांनी बावीस हजार एकर जमीन या मंदिराला दान दिली आहे. ही देवी स्वयंभू असून भरड भागातील एका राईत ही स्वयंभू पाषाणरूपी देवी अवतरली म्हणून तिला भराडी देवी असे म्हणतात. या देवीच्या उगमाविषयी कथा सांगण्यात येते. याशिवाय देवीच्या नवसाला पावणाऱ्या अनेक चमत्कारांविषयी बोलले जाते. त्यापैकी एक कथा पेशवाईशी जोडली गेली आहे. आंगणेवाडीतील पराक्रमी वीर पुरुष, चिमाजी अप्पांच्या सेवेत होता. अटकेपार झेंडा फडकविण्यात त्याचा सिंहाचा वाटा होता, असा इतिहास सांगितला जातो. या स्वराज्य सेवेवर प्रसन्न होऊन कुलस्वामिनी देवी तुळजाभवानी मसुरे गावातील आंगणेवाडी या छोट्याशा भरडावर प्रसन्न झाली. या वीर पुरुषाला दृष्टांत झाला. त्याची दुभती गाय पान्हा सोडत असलेल्या जागी त्याने पाळत ठेवली. तेथे जवळच राईत जाऊन पाषाणावर आपल्या पान्ह्याचा अभिषेक करताना गाय दिसली. या साक्षात्काराने प्रेरित होऊन राई मोकळी केली. गाय ज्या पाषाणावर पान्हा सोडायची, त्या जागी सजीव पाषाण सापडले. त्यानंतर पाषाणाची शुद्धता व प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

पंचवीस वर्षांपूर्वी जत्रा काही हजारांत होत होती. मात्र वर्षा गणिक भक्तांच्या संख्येत वाढ होत असून ती सुमारे दहा लाखांपर्यंत पोहोचल्याचे बोलले जाते. आंगणेवाडीत पूर्वी असलेल्या जागेवर जीर्णोद्धार करून या जागी नवीन मंदिर बांधण्यात आलेले आहे. येथे पाषाणमूर्ती असून तिची नियमितपणे पूजाअर्चा केली जाते. दररोज नवस फेडणाऱ्या भाविकांचीही इथे मोठी गर्दी असते. कोकणातील लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या आंगणेवाडी येथील श्री देवी भराडी मातेच्या वार्षिक जत्रोत्सवात महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक राज्यांतून लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी येतात. देवीच्या दर्शनासाठी भल्या पहाटेपासूनच भाविकांच्या लांबच लांब रांगा लागतात. महाराष्ट्रातील अनेक राजकीय नेते, मराठी अभिनेते, अभिनेत्री या यात्रोत्सवासाठी आवर्जून हजेरी लावतात. भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस, होमगार्ड तैनात असतात. राज्याचे मुख्यमंत्री मंत्री मंडळातील मंत्री, विरोधी पक्षाचे नेते, मुंबई महापालिकेतील नेते या उत्सवात दर्शनासाठी हजेरी लावतात. श्रीभराडी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सरबत, आरोग्य तपासणी अशा सुविधा येथील राजकीय पक्ष देत असतात. जिल्ह्यातूनही भाविक मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवितात.

या देवीच्या मंदिरातील सर्वात मोठा उत्सव म्हणजे फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात होणारा यात्रोत्सव होय. हा यात्रोत्सव आई भराडी देवी सांगेल, त्याच दिवशी होतो. विविध देव - देवतांच्या यात्रा-जत्रा महाराष्ट्रात आणि देशात ठिकठिकाणी होतात परंतु भराडी देवीच्या यात्रेचे वैशिष्ट्य असे की, देवी सांगेल तीच जत्रेची तारीख आणि त्याच तारखेला जत्रोत्सव होतो. देवदिवाळीच्या दुसऱ्या दिवशी डाळप ( डाळ-मांजरी ) होते. तिसऱ्या दिवशी प्रमुख आंगणे मानकरी देवळात जमतात.

देवीचा कौल घेऊन शिकारीस जाण्यात येते. ही पारध करण्यासाठी परिसरातील अनेक लोक सहभागी होतात. सात ते आठ जणांचे गट करून रान काढले जाते व डुकराचीच शिकार केली जाते. ही शिकार केल्यानंतर डुक्कर वाजत-गाजत देवळाजवळ आणला जातो. सुवासिनींकडून पारध करणाऱ्यांना ओवाळले जाते व डुकराची पूजा होते. मंदिराच्या उजव्या बाजूस 'पातोळी' असून या ठिकाणी डुक्कर कापले जाते व कोष्टी प्रसाद म्हणून दिले जाते. शिकार साधल्याच्या तिसऱ्या दिवशी पुन्हा गाव देवळात जमतो. धार्मिकविधी झाल्यानंतर देवीपुढे पंचांग ठेवले जाते व तारीख ठरवून देवीचा कौल मागितला जातो. देवीने कौल देताच जत्रेची तारिख निश्चित होते. भराडी देवीच्या यात्रेकडे केवळ कोकणच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेचे लक्ष लागलेले असते. यात्रेची तारीख निश्चित झाली की, कोकणात जाणाऱ्या गाड्यांचे म्हणजेच रेल्वे, बसचे तिकीट बुकिंग करण्यासाठी मोठी गर्दी उसळते. अवघ्या काही मिनिटांत गाड्यांचे बुकिंग केले जाते. संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे आठ - दहा लाख भाविक भराडी देवीच्या दर्शनासाठी येत असतात. यंदा ही यात्रा २२ फेब्रुवारीला आहे . पूर्वी एक दिवस असणारी ही यात्रा आता दोन दिवस असते. त्यामुळे २२ व २३ फेब्रुवारी हे दोन दिवस ही यात्रा सुरू राहील. आंगणेवाडीत येणारे हे लाखो भाविक देवीच्या दर्शनाची आस घेऊन येथे येतात. वस्त्रालंकारांनी सजविलेली देवी याची देही याची डोळा पाहून जीवनाचे सार्थक झाल्याचा अनुभव भाविकांना या ठिकाणी येतो. याच लाखो भाविकांना भराडी मातेचे दर्शन होण्यासाठी आंगणे कुटुंबीय आणि आंगणेवाडीचे सर्व सदस्य मेहनत घेत असतात. अनेक व्यापारी, व्यावसायिक यांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या या यात्रोत्सवामध्ये मोठ्या प्रमाणात मुंबईकर चाकरमानी उपस्थिती दर्शवितात.

यात्रोत्सवाच्या दिवशी रात्री देवीला नैवेद्य दाखवला जातो. मौनव्रत स्वीकारून आंगणेवाडीतील घराघरात महिला नैवेद्य शिजवतात. भाजी, भात, वरण, वडे असा नैवेद्य तयार केला जातो आणि एकाच वेळी रांगेने मंदिरात जात दाम्पत्यांकडून तो नैवेद्य दाखविला जातो. नैवेद्य दाखवून झाल्यानंतर तो श्रद्धेने जमलेल्या असंख्य भाविकांना वाटप केला जातो. यात्रोत्सवात पूर्वी एकाच वेळी प्रसाद वाटप करणे शक्य होत नव्हते. यामुळे हा प्रसाद उडवला जात होता. त्यामुळे काहीजणांना तो मिळत नव्हता शिवाय तो पायाखालीही येत होता. त्यामुळे ग्रामस्थ मंडळाने ही पद्धत बदलली आणि नैवेद्य दाखवून झाल्यानंतर घरोघरी भाविकांना प्रसाद वाटपाची सोय केली. येणाऱ्या भाविकाला कोणत्याही घरात जाऊन प्रसाद देण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली. पाच वर्षांपासून बदललेल्या प्रसाद वाटपाच्या निर्णयाचे सर्वत्र स्वागत केले जात आहे. अशाच प्रकारे यात्रेची तारीख ठरविण्यापूर्वी केल्या जाणाऱ्या शिकारीची प्रथा बंद व्हावी, अशी अपेक्षाही भाविकांमधून व्यक्त केली जात आहे.

आंगणेवाडी यात्रोत्सवासाठी एसटी प्रशासनाने सज्जता ठेवली आहे. जिल्ह्यातील विविध आगरांमधून तसेच प्रमुख रेल्वे स्थानकामधूनही आंगणेवाडीला एसटी बसेस सोडल्या आहेत. सुमारे दीडशे बसेसची व्यवस्था ठेवली आहे. २२ फेब्रुवारीच्या आंगणेवाडीच्या जत्रे साठी २३ फेब्रुवारी पर्यंत बसेस सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अशी माहिती सिंधुदुर्ग जिल्ह्याचे एस टी चे विभाग नियंत्रक अभिजीत पाटील यांनी सांगितली. तसेच कोंकण रेल्वेने सुध्दा दोन विशेष गाड्या या यात्रेसाठी सुरू ठेवल्या आहेत.



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल क्रोम वापरकर्त्यांसाठी इशारा; होऊ शकते नुकसान




भारत सरकारने गुगल क्रोम वापरणाऱ्यांसाठी एक इशारा दिला आहे. हा इशारा सरकारशी संबंधित एजन्सी, कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीमने दिला आहे. जर तुम्ही गुगल क्रोम इंटरनेट ब्राउझर वापरत असाल तर तुम्ही सावध असले पाहिजे, असं यात सांगितले आहे. हा इशारा विंडोज किंवा मॅकओएसवर या लोकप्रिय ब्राउझरचा वापर करणाऱ्यांसाठी दिला आहे.


CERT-Inने बुलेटिनमध्ये माहिती दिली आहे. यामध्ये सांगितले की, उपकरण वापरणाऱ्या गुगल क्रोम वापरकर्त्यांनी काळजी घ्यावी आणि कोणत्या त्रुटींमुळे ते धोक्यात आहेत. 'गुगल क्रोममधील अनेक भेद्यता एक्सटेंशन APIच्या चुकीच्या अंमलबजावणीमुळे आणि स्किया, व्ही८मध्ये फ्रीच्या वापरामुळे होतात.' या त्रुटींचा फायदा हल्लेखोर आणि घोटाळेबाज घेऊ शकतात.

क्रोम ब्राउझरमधील सध्याच्या त्रुटी ब्राउझरच्या सर्वात महत्त्वाच्या घटकांमध्ये आढळून आल्या आहेत. त्यामुळे वापरकर्त्यांना नुकसान होऊ शकते. सध्याच्या त्रुटींमुळे रिमोट हल्लेखोर दुरून वापरकर्त्यांना लक्ष्य करू शकतात. यासाठी डिव्हाइसवर फिजिकल एक्सेसची गरज नाही.

तुमचे डिव्हाइस खास डिझाइन केलेल्या वेबपेजचा वापर करून हॅक केले जाऊ शकते. यानंतर, तुमचा वैयक्तिक डेटा चोरणे, तुमची ओळख चोरणे आणि इतर घोटाळे करून तुमचे बँक खाते रिकामे करणे यासारख्या कारवायादेखील केल्या जाऊ शकतात.

ब्राउझर आपोआप अपडेट होतो पण तरीही एकदा तपासून तो पुन्हा अपडेट करून घ्या. जर तुमच्या ब्राउझरला अपडेट मिळाले नसेल, तर तुम्हाला दुरुस्तीसाठी वाट पहावी लागेल. Linuxवर १३३.०.६९४३.५३पेक्षा जुने आणि Windows किंवा Macवर १३३.०.६९४३.५३/५४पेक्षा जुने Chrome व्हर्जन रिस्कच्या श्रेणीत येतात. त्यामुळे काळजी घ्या आणि आवश्यक ते बदल करा.

# आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके



**निमित्त**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सशस्त्र क्रांतीचे आद्य प्रवर्तक म्हणजे वासुदेव बळवंत फडके. आज त्यांची पुण्यतिथी...

वासुदेव फडके यांचे मूळ घराणे कोकणातील केळशी (रत्नागिरी जिल्हा) येथील. वासुदेवांचे आजोबा अनंतराव कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. दोन-तीन दिवस किल्ला तटवून अगतिक झाल्यावरच त्यांनी किल्ला १८१८मध्ये इंग्रजांच्या स्वाधीन केला. किल्ल्याजवळ असलेल्या पूर्वीच्या कुलाबा (आताच्यरा रायगड) जिल्ह्यातील शिरढोण गावी पुढे फडके कुटुंबाचे वास्तव्य झाले. बळवंतरावांचा मुलगा वासुदेव. त्याचा जन्म शिरढोण येथेच ४ नोव्हेंबर १८४५ झाला. प्राथमिक शिक्षण शिरढोण येथे झाले. १८५५-६० या पाच वर्षांत माध्यमिक शिक्षण कल्याण, मुंबई, पुणे या ठिकाणी झाले. घरगुती अडचणींमुळे किंवा शिक्षणाची आवड बेताची असल्यामुळे वासुदेव यांनी इंग्रजी पाचवीनंतर शिक्षण सोडले आणि नोकरीला सुरुवात केली. पहिली नोकरी जीआयपी रेल्वेत केली. वरिष्ठांपुढे उगाच विनम्र होण्याचा गुण अंगी नसल्यामुळे त्यांची रेल्वेमधली नोकरी सुटली व नंतरची ग्रँट मेडिकल कॉलेजमधील लेखनिकाची नोकरीही फार दिवस टिकली नाही. शेवटी १८६३मध्ये वासुदेव लष्कराच्या हिशेबी खात्यात आले. त्यात ते १८७९पर्यंत म्हणजे बंडाचा बावटा उभारीपर्यंत राहिले.

मुंबईहून फडके यांची बदली १८६५ साली पुणे येथे झाली आणि पुणे हीच त्यांची कर्मभूमी ठरली. कचेरीतील वातावरण यांत्रिक आणि वासुदेव यांची वृत्ती तर अत्यंत संवेदनशील. वेळेवर रजा मंजूर न झाल्यामुळे आजारी आईची भेट झाली नाही, तेव्हा वासुदेवांनी वरिष्ठांपर्यंत आपली तक्रार नोंदविली. त्यांच्या आयुष्याला क्रांतिकारक वळण लावणारी ही एक महत्त्वाची घटना होय.

पुण्यात सार्वजनिक सभेची स्थापना १८७१मध्ये झाली व तिच्यामार्फत महादेव गोविंद रानडे यांची स्वदेशी चळवळीवर दोन व्याख्याने झाली. ही व्याख्याने आणि देशी वर्तमानपत्रांचा प्रचार यांनी वासुदेवांच्या क्रांतिकारक वृत्तीला खतपाणी पुरविले. ते पुण्यात देशभक्तिपर व्याख्याने देऊ लागले. १८७६-७८ या दरम्यान महाराष्ट्रात दुष्काळ पडले. त्यातच प्लेग-पटकीसारख्या साथीच्या रोगांची भर पडली. गोरगरिबांचे पाण्याचे आणि खाण्याचे फार हाल झाले. शेतकऱ्यांची गुरेढोरे मेली. सर्वत्र मोठा हाहाकार उडाला. वासुदेव यांनी पपायी प्रवास करून लोकांची विपन्नावस्था पाहिली. या दुष्काळास, दारिद्र्यास परकीय सरकार जबाबदार आहे, त्याची हकालपट्टी करून आपल्या लोकांचे शासन स्थापन केले पाहिजे, असा प्रचार त्यांनी सुरू केला. इतरही प्रयत्न केले.

वासुदेवांचे सर्व गुप्त बेत कळल्यामुळे मे. डॅन्यीएलने निजामाचा पोलीस आयुक्त अब्दुल हक याच्या मदतीने वासुदेवांचा पाठलाग सुरू केला. फितुरीमुळे त्यांना त्यांचा ठावठिकाणा मिळाला आणि विजापूर जिल्ह्यातील देवर नावडगी या गावी त्यांना निद्रिस्त अवस्थेत त्यांच्या काही अनुयायांसह पकडण्यात आले पुणे येथे त्यांच्यावर खटला चालविण्यात आला. न्या. न्यूनहॅम यांनी त्यांना जन्मठेपेची -काळ्या पाण्याची शिक्षा फर्मावली. पुढे त्यांची रवानगी एडनच्या तुरुंगात झाली. क्षयरोगाने त्यांना पछाडले. त्यातच अखेरीस त्यांनी अन्नग्रहण सोडले. ते कारावासातच १७ फेब्रुवारी १८८३ रोजी मरण पावले.

(साभार : मराठी विश्वकोष)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# रोज अर्धा तास चाला; अटॅक, स्ट्रोक, मधुमेहाचा धोका कमी!



दररोजच्या धावपळीत आपण अनेकदा आरोग्याकडे लक्ष देत नाही, पण पोषक आहार व नियमित व्यायामामुळे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. नियमित चालणे हासुद्धा एक व्यायामाचा प्रकार आहे. खरंतर चालण्याचे असंख्य फायदे आहेत. दररोज फक्त ३० मिनिटे चालणे तुमच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते. आज आपण या फायद्यांविषयी जाणून घेणार आहोत...

हैदराबाद येथील अपोलो हॉस्पिटलचे न्यूरोलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार सांगतात, ३० मिनिटे चालण्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. नियमित ३० मिनिटे चालण्याने वजन जास्त प्रमाणात वाढणे, लठ्ठपणा, टाईप-२ मधमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक, कर्करोग आणि अचानक मृत्यूचा धोका यांच्या शक्यता कमी होतात.

चालणे हे हाडांच्या आणि स्नायूंच्या आरोग्यासाठीसुद्धा फायदेशीर आहे. ऑस्टिओपोरोसिस म्हणजेच हाडे कमकुवत होणे, सार्कोपेनिया म्हणजे स्नायूंचे वजन कमी होऊन काम करण्याची क्षमता कमी होणे, डायनेपेनिया म्हणजेच स्नायूंची ताकद कमी होणे इत्यादी आजारांचा धोका नियमित ३० मिनिटे चालण्यामुळे कमी होतो.

डॉ. कुमार सांगतात, चालण्याने मानसिक आणि मेंदूचे आरोग्य सुधारते तसेच स्मृतिभ्रंश, नैराश्य व एंग्झायटी कमी होते. चालण्यामुळे झोपेची गुणवत्तासुद्धा सुधारते.

दिल्ली येथील सी. के. बिर्ला हॉस्पिटलच्या फिजिओथेरपी विभागाचे प्रमुख डॉ. सुरेंदर पाल सिंग यांनीसुद्धा ३० मिनिटे चालण्याचे फायदे सांगत डॉ. कुमार यांच्या मताशी सहमती दर्शवली आहे. ते सांगतात, दिवसातून ३० मिनिटे चालणे वजन कमी करणे आणि हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित आरोग्य यांसाठी खूप फायदेशीर ठरते.

खूप हळुवारपणे चालणे तितकेसे प्रभावी ठरत नाही. चालण्याचे अधिक फायदे मिळविण्यासाठी वेळोवेळी चालण्याचा वेग वाढवणे महत्त्वाचे आहे, कारण वेगाने चालणे ही बाब फॅट्स कमी करण्यास मदत करते आणि शरीरातील चयापचय शक्ती वाढवते. त्यामुळे हृदय व रक्तवाहिन्या आणि श्वसनाशी संबंधित आरोग्यसुद्धा सुधारते.

# प्रशासनाच्या तत्परतेमुळे रस्ता मोकळा

## ◆ माथेरानमधील दस्तुरी नाका येथे पडलेले झाड उचलले

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळी असलेले प्रवेशद्वार दस्तुरी नाका येथून सुरू होणाऱ्या मुख्य महात्मा गांधी रस्त्यावर रात्री उशिरा एक झाड पडले. त्यामुळे सकाळी संपूर्ण रस्त्यावरील वाहतूक बंद झाली. घोडे, हातरीक्षा, ई-रिक्षा यांची वाहतूक ठप्प झाली होती. प्रशासनाच्या तत्परते रविवारी सुट्टीच्या दिवशीसुद्धा आपला कामगार वर्ग घटनास्थळी पाठवून पडलेले झाड हे काही वेळातच बाजूला करून मुख्य रहदारी असलेला महात्मा गांधी रस्ता मोकळा करून वाहतूक सुरळीत केली.



माथेरान पर्यटनस्थळ हे उंच डोंगरमाथ्यावर वसलेले असून घनदाट जंगलाने व्यापलेले आहे. त्यामुळे येथे अनेकदा कोणत्याही ऋतूंमध्ये झाडे पडण्याचे प्रकार घडत असतात. असाच प्रकार शनिवारी (दि.१५) रात्री उशिरा माथेरान प्रवेशद्वार दस्तुरी नाका जवळील मुख्य महात्मा गांधी रस्त्यावर घडला. रात्रीच्या वेळी एक मोठे झाड रस्त्याच्या मध्यभागी पडले. रात्रीच्या वेळी पडलेले झाडाचे फोटो रविवारी सकाळी अनेक व्हॉट्सॲप ग्रुप वरून व्हायरल झाले. रविवार असल्याने पर्यटकांची या रस्त्यावर मोठी वर्दळ असते. तसेच या पडलेल्या झाडा मुळे येथील मुख्य वाहतुकीचे साधन असलेले घोडा, ई-रिक्षा आणि हातरीक्षा यांची वाहतूक येथे ठप्प झाली. माथेरान गिरीस्थान नगरपालिका प्रशासनाने तात्काळ आणि गांभीर्याने ही बाब लक्षात घेऊन रविवारी सुट्टी असलेल्या दिवशीसुद्धा कर्मचाऱ्यांना पाठवून मुख्य महात्मा गांधी रस्ता काही वेळातच रहदारी करिता या ठिकाणी मोकळा केला.

माथेरानमधील प्रशासनाच्या तत्परतेमुळे पर्यटनस्थळी येणाऱ्या पर्यटकांची आणि येथील नागरिकांची तसेच वाहतुकीची गैरसोय टळली असून येथील स्थानिक नागरिक, ई-रिक्षा चालक, घोडा व्यावसायिक प्रशासनाचे आभार व्यक्त करीत आहेत.

# भारताच्या यंदाच्या अर्थसंकल्पात भविष्याची बाजू -चंद्रशेखर टिळक

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारताच्य अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी भारताचा २०२५ - २०२६ सालचा जो अर्थसंकल्प मांडला आहे त्यात भविष्याची बाजू आहे. या अर्थसंकल्पाला स्थानिकापासून आंतरराष्ट्रीयस्ताराची पार्श्वभूमी आहे, असे मत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ चंद्रशेखर टिळक यांनी व्यक्त केले.




अलिबाग असोसिएटस आणि मोनोटिनिक यांच्यातर्फे शनिवारी (दि.१५) अलिबाग येथील भाग्यलक्ष्मी सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या अर्थसंकल्पावरील व्याख्यानात चंद्रशेखर टिळक बोलत होते.

भारत भविष्यात शस्त्रास्त्र निर्माण करणारा देश होणार आहे. त्यामुळे संरक्षण क्षेत्रात गुतवणूकीला मोठा वाव आहे. त्याचबरोबर मेडिकल टूरीझम, रिलीजन टूरीझम व कृत्रिमबुध्दीमत्ता या क्षेत्रात देखील आपल्या देशात भविष्यात चांगले दिवस येणार आहेत. त्यामुळे या क्षेत्रात गुतवणूक केल्यास चागंला फायदा होऊ शकतो. योग्य अभ्यास करूनच गुंवणूक करा. कमी कालावधीत दुप्पट पैसे देतो असे सांगणाऱ्यांवर विश्वास ठेवू नका, असा सल्ला चंद्रशेखर टिळक यांनी दिला.

भारतात सध्या जूनी कर प्रणाली व नवीन कर प्रणाली आहे. ज्या करसवलती केद्र सरकारने या अर्थसंकल्पात दिल्या आहेत त्या नवीन कर प्रणाणाली मधून मिळणार आहे. त्यामुळे भविष्यात नवीन कर प्रणाणीच सूरू राहणार हे या अर्थसंकल्पावरून दिसते, असे टिळक म्हणाले.

# कोकण पतसंस्था भूषण पुरस्कार समारंभ



**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकण विभाग विभागीय सहनिंबंधक सहकारी संस्था व कोकण विभाग नागरी सहकारी पतसंस्था संघ, आलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथे कोकण पतसंस्था भूषण पुरस्कार २०२५ समारंभ आयोजितक करण्यात आला होता.

या समारंभात कृत्रिम बुध्दीमत्ता आणि मानवी मेंदूचा समन्वय साधून पतसंस्थांनी काम केले पाहिजे असे मत महाराष्ट्र राज्य पतसंस्था महासंघाचे अध्यक्ष काका कोयटे यांनी व्यक्त केले. रविवारी (दि.१६) क्षात्रैक्य सामाज हॉल कुरूळ येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास आमदार निरंजन डावखरे, महाराष्ट्र राज्य निवडणूक प्राधिकारणाच आयुक्त अनिल कवडे, निवृत्त सहाकर आयुक्त शैलेश कोतमिरे, महाराष्ट्र राज्य पतसंस्था महासंघाचे उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील, कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमात कोकाणतील पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधील १४१ पतसंस्थांचे प्रतिनिधी हजार होते. विविधा गटातील ४८ पतसंस्थांना कोकण पतसंस्थाना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सहकार हेच आपले दैवत आहे असे समजून काम करा. महाराष्ट्रातील पतसंस्थांची चळवळ जगात पहिल्या क्रमांकावर पाहचवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करा, असे आवाहन काका कोयटे यांनी केले.

पतसंस्थांना जे सहकार्य करावे लागेल ते मी करेन. पतसंस्थांना महाराष्ट्र शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी मी प्रयत्न करेन, असे आश्वासन अमदार निरंजन डावखरे यांनी दिले. पतसंस्थांनी आर्थिक कामकाज करत असताना आपले सामाजिक दायित्व देखील जपावे. समर्पित भावनेने काम करणारे कार्यकर्ते तयार करावेत असे अनिल कवडे म्हणाले.

लोकाशाही प्रणाली विकसीत व्हावी यासाठी आम्ही कोकण विभाग नागरी सहकारी पतसंस्था संघ स्थापन केला, असे गिरीश तुळपुळे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. संदीप जगे यांनी सुत्रसंचालन केले.

# माथाडी कामगाराचा मुलगा बनला पोलीस!

**नागोठणे : बातमीदार**

खालापूर तालुक्यातील अतिदुर्गम भागात वसलेल्या वाघेश्वर या धनगरवाडीतील माथाडी कामगार शंकर गोरे यांचा सुपुत्र किरण गोरे याची वयाच्या २२व्या वर्षी महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्याने त्याचे कुटुंबीय आनंदी होत भावूक झाले आहेत.

घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने त्यांनी लहानपणापासूनच पोलीस व्हायचा स्वप्न उराशी बाळगले होते. पोलीस बनुन आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारावी असा चंग त्यांनी स्वतःशी बांधला होता. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याकारणाने तो शिक्षणासाठी आपल्या बहिणीकडे खोपोली येथे राहत होता. तेथूनच त्यांनी आपले पदवी शिक्षण पूर्ण केले व नंतर कर्जत येथील देवा अकॅडमीत पोलीस प्रशिक्षणाचे धडे घेण्यासाठी प्रवेश घेतला. किरण गोरे यांच्या अकॅडमीतील प्रवेशासाठी बहिणी सारिका ढेबे व सुनिता आखाडे तसेच भाऊजी जनार्धन ढेबे व आकाश आखाडे यांनी आर्थिक मदत केली.



आपल्या गरिबीची जाण मनाशी ठेवत किरण गोरे यांनी देवा अकॅडमीत अथक परिश्रम केले. त्याची जिद्द, चिकाटी व पोलीस भरण्याचे स्वप्न पूर्ण करण्याचे असल्याने त्यांनी येथे अथक परिश्रम खूप मेहनत घेत मन लावून अभ्यास केला व पहिल्याच प्रयत्नात तो महाराष्ट्र पोलीस दलात भरती झाला.

# संकष्ट चतुर्थीला अष्टविनायक तीर्थक्षेत्र बल्लाळेश्वर नगरी भाविकांनी बहरली


**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्रख्यात तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत संकष्टी चतुर्थीला बल्लाळेश्वर चरणी भाविकांनी बाप्पाला साकडे घातले. व मनोभावे प्रार्थना केली. संकष्ट चतुर्थीला रविवारी (दि.१६) अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत श्री. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. या वेळी जिल्ह्यातील विविध भागातून पायी दिंडीदेखील आल्या होत्या. माघी गणेशोत्सव देखील मोठ्या उत्साही व भक्तिमय वातावरणात झाला होता. त्यानंतर रविवारी सुट्टीच्या दिवशी आलेल्या संकष्ट चतुर्थीलादेखील भाविकांनी गर्दी केल्याचे पाहावयास मिळाले.



मंदिरात पहाटे पासूनच दर्शनासाठी लांब रांगा लागल्या होत्या. दिवसभर वाहने व भाविकांची मोठी रेलचेल होती. वर्षभर बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविक येत जात असतात. पाली नगरी नेहमीच गजबजलेली असते.

श्री. बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. श्री. बल्लाळेश्वरला देखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. तसेच रांगोळीदेखील काढण्यात आली होती. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून भाविक दाखल झाले होते. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल झाली असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत.



शुक्रवार, शनिवार, रविवार सुट्टी असल्याने नागरिक मोठ्या संख्येने बाहेर पडतात. अशातच व्यवसायिकांचा धंदा ही जोरात होतो.

भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लॉजिंग बोर्डिंगवाले, पापड, लोणचे, मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, सरबतवाले, छोटेमोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरुप आले होते. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली आहे. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत होता. अनेक भाविक स्वतःची वाहने घेवून आले होते. तर काही लक्झरी किंवा खाजगी बसेसने आले. यामुळे पालीतील रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती.

### आदिवासींना रोजगार

***सुधागड तालुका आदिवासी बहुल तालुका आहे. अनेक आदिवासी महिला गावठी भाज्या, कंदमुळे आदी घेऊन विक्रीसाठी बसल्या होत्या. भाविकांनी मोठ्या प्रमाणात यांची खरेदी केला त्यामुळे आदिवासी महिलांना रोजगार मिळाला.***

**सुट्टीच्या दिवशी संकष्ट चतुर्थी आल्यामुळे मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी आले होते. या भाविकांनी दुकानातून चांगली खरेदी केली. त्यामुळे धंदा चांगला झाला आहे.**

**-मनोज मोरे, व्यावसायिक, बल्लाळेश्वर मंदिर**

# उसरोली येथे संत रोहिदास महाराज जयंती

**मुरुड : प्रतिनिधी**

उसरोली येथे श्री. संत रोहिदास महाराज यांची ६४८ वी जयंती मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष गावचे सभासद रमेश पेणकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार व श्रीफळ वाढवून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व इतर सर्व मान्यवरांचे गावचे अध्यक्ष प्रणय धोंडसेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. संत रोहिदास यांच्या जीवन चरित्रावर



मुलांनी भाषण केले. या वेळी मुलांनी संत रोहिदास यांच्या जीवनचरित्रावर माहिती दिली.

मुग्धा नांदगावकर, अवंतिका पेणकर, मनन नांदगावकर, नामदेव नांदगावकर, समाजाचे अध्यक्ष प्रणय धोंडसेकर उपाध्यक्ष उमेश पेणकर उत्कृष्ट मंडळाचे अध्यक्ष आत्माराम नांदगावकर यांनी रोहिदासांच्या जीवनावर योग्य ते मार्गदर्शन केले. जयंतीचे अवचित्त साधून समाजातील पहिली ते डिग्रीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे बक्षीस देऊन अभिनंदन करण्यात आले तसेच या गावातील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत कार्यरत असणाऱ्या शिक्षका हर्षा हेमंत नांदगावकर यांना आदर्श जिल्हा पुरस्कार मिळाल्या त्याबद्दल त्यांचे शाल व श्रीफळ देऊन कार्यक्रमाचे अध्यक्ष समाज अध्यक्ष खजिनदार यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी सुरेश मुरुडकर, सुमित पेणकर, अनंत नांदगावकर, नितेश मुरुडकर, सदाशिव पाब्रेकर, जनार्दन नांदगावकर, लक्ष्मी पेणकर, अशोक म्हशीलकर, सुनील पवार सर, राकेश राकडे सर, रवींद्र पेणकर, सुभाष नांदगावकर, हिरामण नांदगावकर, चंद्रकांत नांदगावकर समाजातील सर्व महिला मंडळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनन नांदगावकर यांनी केले व प्रस्तावना व आभार मंगेश नांदगावकर यांनी मानले.

# माणगावमध्ये पाककला स्पर्धा यशस्वी

**माणगाव : बातमीदार**

सन २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून घोषित केले आहे. त्याचे औचित्य साधून तृणधान्य आधारित पाककृती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कांचनगंगा शिक्षण संस्था संचालित आदर्श प्राथमिक विद्यामंदिर उतेखोल माणगाव या शाळेच्या वतीने तृणधान्यापासून विविध पाककला करण्याकरिता शिक्षक, विद्यार्थ्यांचे पालक तसेच विद्यार्थी यांच्यात पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. गहू, तांदूळ, बाजरी, ज्वारी, मका, ओट्स, वरी, राळे, नाचणी यापैकी कोणतेही पदार्थ वापरून पाककृती तयार करणे हा स्पर्धेचा मूळ विषय होता.

यशस्वी गृहिणी होण्यासाठी पाककलेत पारंगत होणे महत्त्वाचे असते. कारण ज्या गृहिणीस आपल्या पाक कौशल्याने घरातील सर्व माणसांना मंत्रमुग्ध करता येते ती गृहिणी घर आणि संसार यशस्वीरित्या चालवू शकते अशा प्रकारचे मत कांचनगंगा शिक्षण संस्थेचे



मुख्याध्यापक अमोल जंगम यांनी व्यक्त केले आणि त्यासाठी भविष्यात यशस्वी होण्याच्या उद्देशाने त्याचे बीज व आवड ही लहान वयातच म्हणजे शालेय जीवनात रोवणे हे एका शिक्षकाचे कर्तव्य आहे, कारण आजच्या धकाधकीच्या जीवनात आणि फास्ट फूडच्या जगात आपली परंपरागत भारतीय पाककला लोप पावत चाललेली आहे.

पौष्टिकपेक्षा आजकालचे तरुण चवीला जास्त महत्त्व देत असल्याचे दिसते. तसेच आजीच्या हाताची चव व गोडवा पुढच्या पिढीला मिळणे गरजेचे वाटते, म्हणून सदरील पाककला स्पर्धेचे आयोजन केल्याचे अमोल जंगम यांनी सांगितले. या स्पर्धेत शिक्षक, पालक व विद्यार्थी यांनी भाग घेतला होता. पिझ्झा, बर्गर तसेच पावाचा वापर टाळून भारतीय पारंपरिक पद्धतीने आपली पाककला वापरून पौष्टिक जेवण बनवणे हे या स्पर्धेचे मूळ उद्दिष्ट होते.

शाळेच्या पटांगणामध्ये झालेल्या या पाक स्पर्धेमध्ये साक्षी वाघरे प्रथम, निधी उभारे द्वितीय तर प्रसिका जंगम हिचा तृतीय क्रमांक आला. यांना उत्तम प्रकारे वस्तूरूपाने बक्षीस देऊन गौरविण्यात आले. सदरील परीक्षेसाठी सर्व बक्षीसांचे आयोजन दक्षिण रायगड युवा अध्यक्ष भाजप निलेश थोरे यांच्या सौजन्याने देण्यात आले. या स्पर्धेचे मूल्यमापन प्रतिभा पोळेकर, रश्मी अंबुर्ले व नीलम अशोक वनारसे अशा आपल्या पाककलेमध्ये पारंगत असलेल्या शिक्षकांनी केले.

अशा अनोख्या व आगळ्यावेगळ्या स्पर्धेचे आयोजन करून यशस्वीरित्या पार पडल्याबद्दल शिक्षक वर्ग तसेच पालक वर्गातून कांचनगंगा शिक्षण संस्थेचे संस्थापक व संचालक जंगम गुरुजी यांचे जनमानसातून अभिनंदन केले जात आहे.

# तांबाटी ग्रामपंचायतीचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून कौतुक

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांच्या कार्याची माहिती घेऊन रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भारत बास्टेवाड यांनी विशेष कौतुक केले. आज त्यांनी ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांच्या कामाची विशेष पाहणी केली.

खालापूर तालुक्यातील कार्यक्षम व आर्थिक सक्षम असलेली तांबाटी ग्रामपंचायत हि विविध कामाच्या आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात संपूर्ण तालुक्यात अव्वल स्थानी आहेत. नुकताच त्यांनी माझी वसुंधरा ५.० अंतर्गत कोकण विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे. माझी वसुंधरा अंतर्गत ५.० कामाची प्रत्यक्ष पाहणी करून ग्रामपंचायत करीत असलेल्या विविध विकास कामांचीदेखील पाहणी केली. ग्रामपंचायत करीत असलेल्या आपले सेवा केंद्र हे आदर्श आपले सरकार सेवा केंद्र विकसित करणेबाबत योग्य मार्गदर्शन करून प्रधानमंत्री सोलर योजनेत जास्तीत जास्त योजना सोलर करणे बाबत सूचित केले.

या वेळी त्यांनी शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय, रोजगार केंद्र यांची पाहणी करून सर्वच सोलर करणेबाबत मार्गदर्शन केले. महिला बचत गटाने हॅन्डवॉश, साबण हे निमसत्व ब्रँड तयार केले आहे, त्याची पाहणी करून हे उत्पादन कमीत कमी खर्चात तयार करण्याची पद्धत तसेच मार्केटिंग करणेबाबत बचत गटाला मार्गदर्शन केले आणि तेथील उत्पादने स्वखर्चाने विकत घेतली. सांडपाणी व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, घन कचरा व्यवस्थापन, वृक्षारोपण, स्वच्छ पाणी, पाणी साठवण टाकी, गटारे, आरोग्य बाबतची माहिती यांची पाहणी करत असताना ग्रामस्थ यांच्या बरोबर चर्चा करून ग्रामपंचायत विषयी वाटणारी माहिती घेतली. ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम, सरपंच अविनाश आम्ले, उपसरपंच नितीन कदम ग्राम पंचायत कर्मचारी व सदस्य यांचे विशेष अभिनंदन केले.

या वेळी ग्रामपंचायत यांच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी संदीप कराड, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल यांचा सत्कार करण्यात आला.





## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम आज दि. १७/०२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव : **प्रयाग सिटी फेज-१ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित विहीघर, ता. पनवेल, जि. रायगड.** सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. १८/०२/२०२५ ते २४/०२/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक २५/०२/२०२५, नामनिर्देशन माघारी दि. २८/०२/२०२५ ते १५/०३/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान दि. २३/०३/२०२५ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सुचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात, निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय, संस्था कार्यालायः- प्रयाग सिटी फेज - १ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित विहीघर, ता. पनवेल, जि. रायगड. कार्यालयात पाहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी यांची नोंद घ्यावी.

**सही/-**
**संदेश नंदकुमार महाडीक**
निवडणूक निर्णय अधिकारी
प्राधिकृत अधिकारी, कोकण विभाग
पॅनल अ.क्र. वर्ग 'क' ०६/'ई' ०९
प्रयाग सिटी फेज-१ सहकारी गृहनिर्माण संस्था
मर्यादित विहीघर, ता. पनवेल, जि. रायगड.



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE –

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost In lakhs |
|---|---|---|
| Tend-64/ 24-25 RFX 7000035293 | AMC of attending emergency breakdown of EHV cable under EHV (O&M) Circle, Panvel. | **Rs. 100.00 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 14.02.2025 to 03.03.2025 up to 11:00 hrs**, **Opening date:-03.03.2025 @ 11:30 Hrs. Tender Fee- Rs. 500/-+ GST** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL.**

# बांगलादेशी नागरिक आढळल्यास पोलिसांना कळविण्याचे आवाहन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ पोलीस ठाणे हद्दीत परदेशी तसेच बांगलादेशी नागरिक बेकायदेशीर वास्तव्य करुन राहत असल्याचे निदर्शनास आल्यास सुजाण नागरिकांनी नेरूळ पोलीस ठाणे मध्ये तात्काळ समक्ष येऊन अथवा फोन द्वारे माहिती द्यावी, असे आवाहन नेरूळ पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्राह्मनंद नाईकवडे यांनी केले आहे.

नवी मुंबई पोलीस हद्दीत विना परवानगी परदेशी नागरिक आणि बांगलादेशी नागरिक आढळून आल्यास त्यांना तत्काळ अटक करण्याचे आदेश नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबईतील सर्वच पोलीस ठाणे प्रशासनाना दिले आहेत.



नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या आदेशाची दखल घेत नेरूळ पोलीस ठाणे हद्दीतील सारसोळे, शिरवणे, नेरुळ, जुईपाडा, कुकशेत, दारावे आदि गावातील ग्रामस्थांनी अधिक भाड्याच्या अमिषापोटी परदेशी वा बांगलादेशी नागरिकांना भाड्याने ठेऊ नये, नेरूळ पोलीस ठाणे हद्दीतील संबंधित बिल्डर्स यांनी आपल्या बांधकाम साईटवर तसेच लेबर कॅम्पमध्ये अशा नागरिकांना ठेऊ नये तसेच सामान्यनागरिकांनी घरकाम, हॉटेलमध्ये वेटर वा अन्य ठिकाणी बांगलादेशीना ठेऊ नये.

आपल्या देशाला घोका निर्माण करणारे परदेशी तसेच बांगलादेशी नागरिक बेकायदेशीर वास्तव्य करुन राहत असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा एखाद्या संबंधित व्यक्ती विषयी संशय आल्यास जागृत नागरिकांनी तात्काळ नेरूळ पोलीस ठाण्यामध्ये समक्ष येऊन अथवा फोनद्वारे माहिती द्यावी, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्राह्मनंद नाईकवडे यांनी कळविले आहे.

# नवी मुंबई महापालिकेला पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

एक खासगी संस्थेच्या माध्यमातून 'वेस्ट टेक सिम्पोजियम' मध्ये नवी मुंबई महानगरपालिकेस स्मार्ट गव्हर्नन्स क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'स्मार्ट गव्हर्नन्स पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी हा पुरस्कार सिने निर्मात्या कांचन अधिकारी व सिने अभिनेते महेश ठाकूर यांच्या हस्ते मुंबईतील विशेष समारंभात स्विकारला. या वेळी प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार उपस्थित होते.



शहरी पायाभूत सुविधा पुरविताना पर्यावरणाची काळजी घेऊन शाश्वत विकास साधला जावा ही संकल्पना नजरेसमोर ठेवून आयोजित या 'वेस्ट टेक सिम्पोजियम' मध्ये ई-गव्हर्नन्स क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कंपन्या, तंत्रज्ञान क्षेत्रात अभिनव काम करणाऱ्या कंपन्या तसेच महानगरपालिकेशी निगडीत तांत्रिक सेवा पुरविणाऱ्या संस्था त्याचप्रमाणे गुजरात, गोवा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, पश्चिम बंगाल अशा विविध राज्यातील महानगरपालिका व इतर शासकीय संस्था सहभागी झाल्या होत्या.

नवी मुंबई महानगरपालिकेने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरी प्रशासनात केलेला डिजीटल माध्यमांचा प्रभावी वापर व त्यामुळे सार्वजनिक सेवा वितरण करताना कार्यक्षमतेत झालेली वाढ, कामकाजात वृध्दिंगत झालेली पारदर्शकता व नागरिकांना मोठ्या प्रमाणात झालेला प्रत्यक्ष लाभ अशा विविध बाबींचा विचार करून नवी मुंबई महानगरपालिकेस 'स्मार्ट गव्हर्नन्स पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

तंत्रज्ञानाचा कामकाजात प्रभावी उपयोग करून त्याचा लाभ नागरिकांना मोठ्या प्रमाणात व्हावा असा दृष्टिकोन जपणाऱ्या आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेने दैनंदिन कामकाजात ई ऑफिस प्रणालीचा प्रभावी उपयोग सुरू केला आहे

## निवडक

### ऐरोलीत अतिक्रमणावर कारवाई

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे बांधकामाविरोधात नवी मुंबई अतिक्रमण विभागामार्फत ऐरोलीत कारवाई करण्यात आली. ऐरोलीतील सेक्टर ३ येथील गामी जनरल स्टोअर्स, गाळा नं. ऐ - ३३, ऐरोली येथील वाढीव बांधकाम महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे केलेले होते. ही अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत नोटीस बजाविण्यात आलेली होती. अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व अतिक्रमण विभागाचे उपायुक्त भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली ऐरोलीत कारवाई करण्यात आली.

### व्यापाऱ्याला दोन कोटींचा गंडा

**नवी मुंबई :** फेसबुकवर तरुणीसोबत झालेली मैत्री कपडा व्यापाऱ्याला दोन कोटींना पडली आहे. अज्ञाताने तरुणीच्या नावाने त्यांना गळाला लावून ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतविण्यास सांगून ही फसवणूक केली आहे. आपण गंडल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर त्याने पोलिसांकडे तक्रार केली. पनवेल परिसरात राहणाऱ्या कपडा व्यापाऱ्यासोबत हा प्रकार घडला आहे. काही महिन्यांपूर्वी त्यांना फेसबुकवर मुलीची फ्रेंड्स रिक्वेस्ट आली होती. दोघांमध्ये चॅटिंग सुरू असताना तरुणीने त्यांना ऑनलाईन ट्रेडिंगबद्दल माहिती दिली. तिच्यावर विश्वास ठेवून त्यांनी एक कोटी ९७ लाख ४६ हजार रुपये गुंतविले होते, मात्र पाच ते सहा महिन्यांनी त्यांना ना नफा मिळाला ना गुंतवणूक केलेली रक्कम. त्यावरून फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

# इन्स्टाग्रामवर ब्लॅकमेल करून अत्याचार

**नवी मुंबई : बातमीदार**

इन्स्टाग्रामवरून झालेल्या ओळखीतून महिलेची आर्थिक फसवणूक व अत्याचार झाल्याची घटना समोर आली आहे. दोघांमधील चॅटिंग पतीला दाखविण्याची भीती दाखवून महिलेकडून पैसे उकळण्यात आले. त्याशिवाय भेटीसाठी बोलावून अत्याचारदेखील केला. याप्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




रबाळे पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या महिलेसोबत हा प्रकार घडला आहे. महिलेची इन्स्टाग्रामवरून एका तरुणासोबत ओळख झाली होती. त्यांच्यात मैत्रीमध्ये चॅटिंग सुरू असताना तरुणाने ते चॅटिंग पतीला धाखविण्याची भीती दाखविली. हे टाळण्यासाठी त्याने पैशाची मागणी करत तिच्याकडून एक लाख ७४ हजार रुपये उकळले. यानंतरही तरुण तिला व पतीला मारण्याची धमकी देत होते. अखेर त्याने तिला भेटीसाठी बोलावून अत्याचार केला.

यानंतरही तो तिला त्रास देऊ लागल्याने अखेर महिलेने त्याच्या विरोधात पोलिसांकडे तक्रार केली आहे. त्यावरून एकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोहूस अधिक तपास करीत आहेत.

# दामदुप्पट योजना चालवणाऱ्या कंपनीवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

दामदुप्पट योजना चालवणाऱ्या कंपनीवर गुन्हे शाखेने कारवाई केली आहे. नागरिकांकडून पैसे गुंतवणूक करून घेतले जात असतानाच पोलिसांनी ही कारवाई केली आहे. याप्रकरणी एकावर वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाशी सेक्टर १७ परिसरात दामदुपट्ट योजना चालवली जात असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यावरून कक्ष १ च्या पथकाने कार्यालयाची माहिती मिळवून त्या ठिकाणी छापा मारला. यावेळी तिथे वेगवेगळ्या योजनेत पैसे गुंतवण्यास सांगून अल्पवधीत नफ्याचे आमिष दाखवले जात असल्याचे समोर आले. याप्रकरणी भोलाकुमार चौधरी याच्यावर वाशी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.आरोपी सातवी नापास असून सांताक्रूझ येथे राहणारा आहे. त्याने वाशीत कंपनीचे कार्यालय सुरू करून गुंतवणुकीतून नफ्याच्या योजना काढल्या होत्या. मोठा घोटाळा घडण्यापूर्वीच पोलिसांनी कारवाई केली.

# संत शिरोमणी सेवालाल महाराज जयंती साजरी

## आमदार मंदा म्हात्रेंनी घेतले दर्शन

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

बंजारा समाजाचे आराध्य दैवत थोर संत सेवालाल महाराज यांनी समाजाला सेवाभाव आणि भक्तीचा मार्ग शिकवला. योग्य दिशा दाखवत समाजात जनजागृती केली. यानिमित्ताने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संत सेवालाल महाराज बंजारा सेवा ट्रस्ट यांच्या माध्यमातून संत शिरोमणी सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबईतील विविध ठिकाणी भेटी देऊन थोर संत सेवालाल महाराज यांचे दर्शन घेतले.

सीबीडी सेक्टर ८ येथील जगदंबा मातेच्या मंदिरात हा उत्सव उत्साहात झाला. जयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये बंजारा बांधवांसाठी होम पूजन, भजन, जागरण, तसेच भव्य मिरवणूक व भक्तांसाठी महाप्रसाद असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. थोर संत सेवालाल महाराज यांच्या जयंती उत्सवात आमदार मंदा म्हात्रे सहभागी झाल्यामुळे बंजारा समाजानी आनंद व्यक्त केला.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भारतीय जनता पक्ष संत सेवालाल महाराज यांच्या प्रेरणेतून बंजारा समाजाचा गौरवशाली वारसा जपण्यासाठी सदैव कटिबद्ध राहील, अशी ग्वाही आमदार मंदा म्हात्रे या वेळी बंजारा बांधवांना दिली.

या वेळी जयसिंग पवार, नम्रता पवार, विजय पवार, किशन राठोड, अनिल राठोड, पिंटू अण्णा तसेच महाराज बंजारा सेवा ट्रस्टचे पदाधिकारी, कार्यकर्ते व बंजारा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अभिनेते राहुल सोलापूरकर यांच्या वक्तव्याविरोधात निवेदन



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि विश्वरत्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी केलेल्या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी संविधान रक्षक भारतीय नागरिक सानपाडा विभाग यांच्या वतीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास कठाळे, सानपाडा पोलीस ठाणे यांना शुक्रवारी निवेदन देण्यात आले.

या वेळी विभाग प्रमुख बाबाजी इंदोरे, उपविभाग प्रमुख सुनील बैसाणे, शाखाप्रमुख रवी शिंदे तसेच सम्यक प्रतिष्ठान अंतर्गत बोधीवृक्ष विहार सानपाडा या संस्थेचे आजी माजी पदाधिकारी रघुनाथ कांबळे, संजय कांबळे, सोमनाथ उघाडे, अशोक नेप्ते, सुर्यकांत भंडारे, गौतम कांबळे, एस.एन.गवई, सुरेश जाधव आणि बौद्धाचार्य बी.बी.खरात गुरुजी व बौद्धाचार्य धनंजय खंडे गुरुजी आदी उपस्थित होते.


















**पनवेल : कोशिश फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व आंतरशालेय स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शहरातील फडके नाट्यगृहात उत्साहात झाला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांसाठी 'आज्ञीबाई जोरात' या पहिल्या एआय महाबालनाट्याचे आयोजन करण्यात आले होते.**

## क्लिक...क्लिक...!



**सातारा : खटाव तालुक्यातील गुरसाळे गावामध्ये बहरलेली गव्हाची शेती आणि आकाशामध्ये तयार झालेल्या रंगछटा टिपल्या आहेत शरद जाधव यांनी.**

# 'केबीपी'मध्ये अमेरिकन अर्थतज्ज्ञ डेव्हिड ओ'गॉर्मन यांचे व्याख्यान

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात शनिवारी (दि.१५) अर्थशास्त्र विभागाच्या वतीने अमेरिकन अर्थतज्ज्ञ डेव्हिड आर. ओ'गॉर्मन यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक उपस्थित होत्या.

अर्थतज्ज्ञ डॉ. डेव्हिड आर. यांनी पाश्चिमात्य जगात भारताचे भविष्य आणि वाटचाल या विषयावर व्याख्यान दिले. या कार्यक्रमाला मुंबई विद्यापीठातील डीएलएलई विभागाचे संचालक डॉ. बळीराम गायकवाड, मुंबई अर्थशास्त्र क्लबचे प्रमुख डॉ. शशी पनिकर, सितारा पनिकर व अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.हर्षद जाधव उपस्थित होते. अर्थतज्ज्ञ डेव्हिड आर. ओ'गॉर्मन यांनी आपल्या व्याख्यानात जागतिक अर्थव्यवस्थेतील भारताची भूमिका सविस्तरपणे मांडली. भारताने नव्या आर्थिक व्यवस्थेत कसे पुढे जावे, याविषयी त्यांनी सखोल माहिती दिली. तसेच विज्ञान, तंत्रज्ञान, गणित व आभियांत्रिकी क्षेत्रातील भारताची प्रगती आणि त्याचा देशाच्या आर्थिक विकासावर होणारा प्रभाव यावरही प्रकाश टाकला.



आंतरराष्ट्रीय स्तरावर नकारात्मक मानल्या जाणाऱ्या काही बाबी भारतीय संदर्भात कशा सकारात्मक ठरू शकतात. याबाबत चर्चाही केली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी सूत्रसंचालन प्रियांका पांडे यांनी तर आभार सुहाली जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# पनवेलमध्ये एकल कथक नृत्य स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल कल्चरल सेंटर आणि कर्नाटक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच एकल कथक नृत्य स्पर्धेचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले होते.

या स्पर्धेचे उद्दिष्ट हे बालनृत्यांगनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, कथक या नृत्यप्रकाराविषयी विषयी लोकांमध्ये जागृती निर्माण करणे व कथकचा प्रसार करणे हे या स्पर्धेचे उद्दिष्ट होते. या स्पर्धेला राज्यभरातून भरभरून प्रतिसाद मिळाला. ५१ स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला. मानसी देशपांडे आणि चेतन सरय्या या कथक क्षेत्रातील दोन दिग्गज व्यक्तींनी स्पर्धेचे परीक्षण आणि सर्व स्पर्धकांना मार्गदर्शन केले.



या स्पर्धेच्या गट १ - अ मध्ये मिहीका भिडे हिला प्रथम, अनाहिता बहुगुणा हिला द्वितीय आणि स्वरा इशवाद आणि रचना बेंबळीकर या दोघींना तिसरे पारितोषिक देण्यात आले. गट १ - ब: मध्ये अभिज्ञा जोशी हिला प्रथम अनन्या माकोडे हिला दुसरे बक्षीस देण्यात आले.

तर गट २ मध्ये सुहानी भट हिला प्रथम, सहिष्णुता राजाध्यक्ष हिला दुसरे तर पराग कुंभार याला तिसरे बक्षीस ती अत्यंत यशस्वीपणे झाली. या वेळी पनवेल कल्चरल सेंटरचे अध्यक्ष मिलिंद गोखले तसेच कर्नाटक संघाचे उपाध्यक्ष गुरुप्रसाद शेट्टी उपस्थित होते.

# कर्जत रेल्वे फलाटावरील सरकते जिने सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वेस्थानकात फलाट क्रमांक एकवरील मुंबईकडील सरकत्या जिन्यांचे काम पूर्ण झाले असून हे दोन्ही जिने सुरू करण्यात आले आहेत. या जिन्यांमुळे ज्येष्ठ नागरिक, अपंग तसेच महिला प्रवाशांची चांगली सोय झाली आहे.



कर्जत रेल्वेस्थानकात फलाट क्रमांक दोनवर प्रशासनाने काही वर्षूर्वी सरकता जिना उपलब्ध करून दिला आहे तसेच फलाट क्रमांक एकवरसुद्धा एक चढण्यासाठी व एक उतरण्यासाठी अशा दोन सरकत्या जिन्यांचे काम काही महिन्यांपासून सुरू होते. ते कधी पूर्ण होणार? आणि त्याचा वापर कधी सुरू होणार? असा प्रश्न प्रवासीवर्ग उपस्थित करीत होता. याबाबत कर्जत येथील सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला असता रेल्वे प्रशासनाने ओसवाल यांना या दोन्ही सरकत्या जिन्यांचे काम प्रगतिपथावर आहे आणि हे सरकते जिने २७ जानेवारीपर्यंत सुरू होण्याचे शक्यता आहे असे लेखी कळविले होते, परंतु काम पूर्ण न झाल्याने २७ तारखेचा मुहूर्त टळला होता.

यांनतर ओसवाल यांनी आपला पाठपुरावा सुरूच ठेवला. हे जिने कधी सुरू होणार? असे विचारले असता काम पूर्ण झाल्यावर कधीही सुरू होतील, असे उत्तर दिले. त्यानुसार दोन्ही जिने सुरूसुद्धा करण्यात आले. हे जिने सुरू झाल्याने ज्येष्ठ नागरिक, अपंग तसेच महिला प्रवाशांची चांगली सोय झाली आहे.

**कर्जत येथील फलाट क्रमांक एकवर असलेल्या सरकत्या जिन्यांचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे व ते कर्जतकरांना उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून ज्येष्ठ नागरिक, महिला व अन्य प्रवाशांनासुद्धा या जिन्यांचा उपयोग होईल, असे रेल्वे प्रशासनाला कळवले होते. अखेर जिने सुरू झाले. याचे समाधान आहे.**

**–पंकज ओसवाल, सामाजिक कार्यकर्ते,**

# 'सुप्रीम पेट्रोकेमिकल्स'कडून पळस शाळेला प्रोजेक्टर, वॉटर कुलर व शौचालय उपलब्ध

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील आमडोशी येथील सुप्रीम पेट्रोकेमिकल्स लि. कंपनीकडून सामाजिक कार्यकर्ते किशोर म्हात्रे यांच्या प्रयत्नाने व कंपनीचे वरिष्ठ अधिकारी आनंद वागळे यांच्या विशेष सहकार्याने पळस येथील माध्यमिक शाळेस तीन प्रोजेक्टर, एकवॉटर कुलर व चार शौचालय देण्यात आले. याचे उद्घाटन नुकतेच म्हात्रे यांच्या हस्ते झाले.



दरम्यान, या शाळेस काही दिवसांपूर्वी पळस ग्रामपंचायतीच्या वतीने दोन टेबल, दोन खुर्च्या, वॉटर कुलर, कपाट व मुख्याध्यापक खुर्ची भेट देण्यात आलेली आहे. या कार्यक्रमाचे औचित्य साधून इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ झाला. त्या वेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला सरपंच निष्ठा विचारे, बेणसे माजी सरपंच अ. का. म्हात्रे, पीएनपी एज्युकेशन सोसायटी पळसचे अध्यक्ष गजानन भोईर, उपाध्यक्ष शशिकांत शिर्के, सदस्य जोमा तांबोळी, गणपत डाकी, ज्ञानेश्वर शिर्के, प्रकाश तांबोळी, चंद्रकांत डाकी, वासुदेव डाकी, शांताराम मांडवकर आदींसह शाळेचे मुख्याध्यापक कृष्णा ठाकूर, सहशिक्षिका सायली ठाकूर, शिक्षक लक्ष्मण मोकल, समीक्षा यादव, प्रेरणा शेळके, कारकून मोहन भोपी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक कृष्णा ठाकूर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शिर्के यांनी मानले.

# शालेय पोषण आहार अंतर्गत पाककला स्पर्धा

**महाड : प्रतिनिधी**

शालेय पोषण आहार अंतर्गत पोषण आहार बनवणाऱ्या स्वयंपाकी महिलांकरिता राज्य शासनाने विविध ठिकाणी पाककला स्पर्धांचे आयोजन केले होते. केंद्रस्तरावर या स्पर्धा झाल्यानंतर त्यातील विजेत्यांची स्पर्धा महाड पंचायत समिती येथे झाली. या स्पर्धेचे उद्घाटन गटविकास अधिकारी स्मिता पाटील यांच्या हस्ते केले.



प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत या पाककला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. शाळास्तर आणि तालुकास्तरावर या स्पर्धा आयोजिल्या जात आहेत. केंद्र शासनाने आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष जाहीर केल्यानंतर तृणधान्य आणि परिसरातील पालेभाज्यांच्या आधारे बनवण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांचा महाड येथील या स्पर्धेमध्ये समावेश करण्यात आला होता.

या स्पर्धेवेळी गटविकास अधिकारी स्मिता पाटील, सहाय्यक गटविकास अधिकारी श्री. कटरे, शिक्षणाधिकारी राजन सुर्वे आदी उपस्थित होते. तालुक्यातील जवळपास ३० शाळांची निवड या स्पर्धे करिता करण्यात आली होती.

या वेळी गटविकास अधिकारी सुनीता पाटील यांनी, शालेय पोषण आहारामध्ये मुलांना सकस आहार मिळण्यासाठी आणि त्या पद्धतीने देण्यासाठी शाळांमधील स्वयंपाक करणाऱ्या महिलांनी लक्ष दिले पाहिजे. या स्पर्धेच्या माध्यमातून समावेश केलेल्या तृणधान्य आणि पोर्टफोलिओ तांदळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारातून पोषणमूल्य जपली गेली तर मुलांचा विकास होण्यास मदत होईल, असे सांगितले.

गटशिक्षणाधिकारी श्री. सुर्वे यांनीदेखील आपल्या मनोगतामध्ये शालेय पोषण आहार योग्य पद्धतीने मुलांपर्यंत दिल्यास मुलांनादेखील त्याची गोडी निर्माण होईल, असे स्पष्ट केले.

## निकम स्कूलमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम

**माणगाव : बातमीदार**

एस.एस. निकम इंग्लिश स्कूल इंदापूरमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मुकेश अशोक सुपनेकर (उद्योजक, व्यावसायिक) आणि भाग्यश्री मुकेश सुपनेकर (मुख्याध्यापिका, सौ.सुंदरादेवी राठी हायस्कूल, पुणे) उपस्थित होते. त्याचबरोबर माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे पदाधिकारी, शाळेचे चेअरमन अमोल कुळकर्णी, एसएमसी चेअरमन संपदा कुळकर्णी, शाळेच्या मुख्याध्यापिका रंजिता जाधव, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका संचिता जाधव मॅडम, पूर्व प्राथमिक विभागाच्या इन्चार्ज संपदा पाटील तसेच शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या वेळी सांस्कृतिक कार्यक्रम रंगतदार झाला.

# निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील छत्रपती शासन व अर्जुन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ शिपूरकर वाघरे इंग्रजी माध्यम शाळा सभागृहात झाला. या वेळी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे व इतर मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले.

२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त माणगाव तालुक्यातील इयत्ता पाचवी ते महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी तसेच खुल्या गटासाठी मराठी व इंग्रजी माध्यमातून महात्मा जोतिबा फुले सामाजिक समतेचे प्रणेते, राजश्री शाहू महाराजांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिवचरित्र–प्रेरणादायक संघर्ष आणि विजयाची गाथा अशा विविध विषयांवर व वयोगटांसाठी निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेला तालुक्यातून विद्यार्थीवर्गाचा व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यशस्वी स्पर्धकांना माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.राजीव साबळे, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर नितीन बामगुडे, शिपूरकर स्कूल कमिटी चेअरमन अरुण पवार, शिपूरकर व वाघरे इंग्रजी माध्यम शाळेच्या मुख्याध्यापिका मनीषा मोरे, श्रीमती गंगुबाई शिंदे सीबीएससी स्कूलच्या प्राचार्य निशिगंधा मयेकर आदींच्या उपस्थितीत बक्षीस देऊन गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना प्रोत्साहनपर प्रशस्तीपत्रक देण्यात आले. आयोजकांतर्फे डॉ. अमेय उभारे व सहकाऱ्यांनी स्वागत केले.




# मराठी भाषेचे संवर्धन : राज्य मराठी विकास संस्थेची भूमिका

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे २१, २२ व २३ फेब्रुवारी या तीन दिवसांत संपन्न होत आहे. हे ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आहे. मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे हे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आहे. संमेलन यशस्वी करण्यासाठी अनेक हात मदत करत आहे. शासनही याला पाठबळ देत आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.

भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाला अनुसरून १ मे १९६० रोजी भारतीय संघराज्यांतर्गत मराठी भाषकांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. जुलै १९६०मध्ये मराठीचा शासनव्यवहारात वापर करण्याबाबतचे शासनाचे धोरण राबवण्यासाठी भाषासंचालनालयाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्राचे साहित्य, इतिहास व संस्कृती ह्यांच्या विकासासाठी नोव्हेंबर १९६०मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाची स्थापना करण्यात आली. (मराठी विश्वकोशाचे काम प्रथमतः साहित्य आणि संस्कृति मंडळाचा एक प्रकल्प म्हणून सुरू झाले असले तरी त्याची व्याप्ती पाहून १९८०मध्ये त्यासाठी स्वतंत्रपणे महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळाची स्थापना करण्यात आली.) १९६५मध्ये महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४द्वारे राज्याच्या प्रशासनिक व्यवहाराची भाषा म्हणून मराठी भाषा प्रस्थापित झाली.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने २५ जून १९७९ रोजी मुंबई येथे 'महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक अभ्यासक्रमात व प्रशासनात मराठी भाषेचे स्थान' या विषयावर एक परिषद घेतली होती. त्या परिषदेत मराठी भाषेसाठी एक राज्यस्तरीय संस्था स्थापण्यात यावी, अशी सूचना पुढे आली.

पुढे शिक्षण व सेवायोजन विभागाच्या २२ ऑक्टोबर १९९०च्या शासननिर्णयानुसार मराठीस शासनात व देशात योग्य दर्जा मिळवण्यासाठी मा. मुख्यमंत्री ह्यांच्या अध्यक्षतेखाली 'मराठी भाषा उच्चाधिकार समिती' स्थापन करण्यात आली. सदर समितीची पहिली बैठक दि. १८ नोव्हेंबर १९९१ मध्ये घेण्यात आली. ह्या बैठकीत 'राज्य मराठी विकास संस्था' स्थापन करण्याच्या दृष्टीने विचार करण्यासाठी उपस्थित असलेल्या अशासकीय सदस्यांची एक उपसमिती (सुकाणू समिती) नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रा. वसंत बापट हे समितीचे अध्यक्ष होते. तर शिक्षण व सेवायोजन विभागाचे सचिव हे तिचे सदस्य–सचिव होते. ह्या समितीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. अशोक केळकर, डॉ. यू. म. पठाण अशा मराठीच्या विद्वान अभ्यासकांचा समावेश होता. एकंदर चार बैठका घेऊन समितीद्वारे प्रस्तावित राज्य मराठी विकास संस्थेची उद्दिष्टे, तिने हाती घ्यायचे कार्यक्रम, तिचे व्यवस्थापन, आवश्यक सुविधा, अधिकारी व कर्मचारी वर्ग आणि आर्थिक तरतुदींची आवश्यकता ह्यांवर सांगोपांग विचार करून ११ मार्च १९९२ रोजी समितीद्वारे आपला अहवाल शासनाला सादर करण्यात आला.

राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना

त्या अनुषंगाने ३० एप्रिल १९९२ च्या शासननिर्णयाद्वारे मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाद्वारे दिनांक १ मे १९९२ रोजी राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना करण्यात आली.. मराठी भाषेच्या प्रशासकीय, साहित्यिक–सांस्कृतिक आणि ज्ञानकोशात्मक संवर्धनासाठी महाराष्ट्र शासनाने ह्यापूर्वीही संस्था उभारल्या होत्या हे लक्षात घेता राज्य मराठी विकास संस्थेद्वारे त्या संस्थांच्या कार्याहून वेगळे आणि व्यापक कार्य होणे शासनाला अभिप्रेत होते असे अनुमान निश्चितच करता येते.

**संस्थेची कार्यकक्षा**

राज्य मराठी विकास संस्थेचे स्वरूप आणि सुकाणू समितीच्या अहवालात तसेच संस्थेच्या घटनेत नोंदवण्यात आलेल्या उद्दिष्टांचा विचार केला तर ह्या संस्थेचे वेगळेपण अधोरेखित होते. 'मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास' हे संस्थेचे बोधवाक्य आहे. त्यावरून ह्या संस्थेच्या व्यापक कार्यकक्षेची कल्पना येऊ शकेल. राज्य मराठी विकास संस्था ही मुख्यत्वे विद्याशाखीय (कॅडेमिक) स्वरूपाचे कार्य करणारी संस्था आहे. विविध क्षेत्रात मराठीचा होणारा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जावा ह्यासाठी प्रयत्नशील राहावे व मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करावी ही ह्या संस्थेच्या स्थापनेमागील मुख्य उद्दिष्टे आहेत.

या उद्दिष्टांना अनुसरून विविध स्तरांवर मराठीचा विकास साधण्यासाठी संस्थेद्वारे स्वतंत्रपणे उपक्रम हाती घेण्यात येत असतात. तसेच भाषा व संस्कृती ह्या क्षेत्रांत मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी काम करणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय संस्थांशी समन्वय साधून त्या संस्थांच्या साहाय्यानेही काही उपक्रम संस्थेद्वारे राबवण्यात येतात.

मराठी भाषेचा स्वभाषा म्हणून तसेच परभाषा म्हणून अभ्यास, मराठीच्या विविध प्रादेशिक आणि सामाजिक बोलींचा अभ्यास व त्यांतून साकारणारी सांस्कृतिक वैशिष्ट्ये ह्यांचा अभ्यास, शासनव्यवहार तसेच इतर विविध व्यवहारक्षेत्रे आणि विद्याशाखा ह्यांतील मराठी भाषेच्या वापराविषयीचे अभ्यास आणि सर्वेक्षणे, महाराष्ट्राबाहेरील देशातील व अन्य देशांतील मराठी भाषक–समूहांना मराठीच्या व्यापक विस्ताराद्वारे जोडून घेऊन त्या त्या ठिकाणच्या मराठीच्या व्यवहाराला प्रोत्साहन व बळ देणे तसेच तेथील भाषावैशिष्ट्यांचा अभ्यास करणे, मराठीला तंत्रज्ञानाची जोड लाभावी ह्यासाठी सक्रिय प्रयत्न करणे आणि ह्या सर्वांतून मराठीच्या व्यापक सांस्कृतिक अवकाशाला विस्तारणे ही संस्थेच्या स्थापनेमागची व्यापक उद्दिष्टे लक्षात घेऊन संस्थेचे आजवरचे काम होत आलेले आहे.

**मराठीचा स्वभाषा म्हणून अभ्यास**

स्वभाषा म्हणून मराठी भाषेचा अभ्यास व्हावा ह्यासाठी संस्थेद्वारे विविध प्रकल्प, उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. ह्यासाठी मराठी लेखनमार्गदर्शिका, शालेय मराठी शब्दकोश, विज्ञान संकल्पना कोश तसेच भाषावैज्ञानिक दृष्टिकोणातून मराठीच्या विविध वैविध्यांचा आढावा घेणारे लेखनही (उदा. वृद्धी : भाषा आणि भाषाव्यवहार, बेलभाषा, भाषा आपली सर्वांचीच इ.) संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात आलेले आहे.

तसेच संस्थेद्वारे श्री. शंकर गणेश दाते ह्यांच्या मराठी ग्रंथसूचीचे (१८०० ते १९५०) पुनर्प्रकाशन करण्यात आले. ह्या सूचीत १८०० ते १९५० ह्या कालखंडातील मुद्रित मराठी ग्रंथांच्या विषयवार माहितीचा समावेश आहे. इतक्यावरच न थांबता संस्थेद्वारे इ. स. २०००पर्यंतच्या मुद्रित ग्रंथांच्या सूचीचे काम पूर्ण करण्यात आले असून त्यांपैकी १९८६पर्यंतच्या ग्रंथसूचीचे काम पुस्तकरूपात उपलब्ध आहे. ह्याव्यतिरिक्त महाराष्ट्राबाहेरील विविध संग्रहांत (तंजावूर, हैदराबाद, कर्नाटक, त्रिवेंद्रम, मद्रास) उपलब्ध मराठी हस्तलिखितांच्या सूची संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

**मराठीचा परभाषा म्हणून अभ्यास**

सध्याचे जग हे बहुभाषक असल्यामुळे महाराष्ट्राबाहेरील किंवा अन्यभाषक समाजघटकांना मराठी भाषा आणि संस्कृती ह्यांच्याशी जोडून घेण्याच्या उद्देशाने संस्थेद्वारे करुणाष्टक, माचीवरला बुधा, टिकलीएवढं तळं, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे, कल्याणी, दिवसेंदिवस, एका श्वासाचं अंतर इत्यादी महत्त्वाच्या मराठी साहित्यकृतींची हिन्दी भाषांतरे करून घेऊन प्रकाशित केली आहेत. त्याबरोबरच मुंबई विद्यापीठातील जर्मन विभागाद्वारे अन्य भाषकांना संवादात्मक पद्धतीने मराठी शिकवण्याच्या आधुनिक पद्धतींवर आधारित असा माय मराठी हा अभ्यासक्रम आणि त्यासाठी अभ्याससामग्री संस्थेद्वारे तयार करून महाजालावरून मुक्त (फ्री ॲण्ड ओपन सोर्स) स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**मराठीच्या बोलींचा अभ्यास**

मराठीच्या प्रमाणभाषेसोबतच मराठीच्या विविध प्रादेशिक आणि सामाजिक बोलींचा अभ्यास होत राहणे आवश्यक असल्याने संस्थेद्वारे मराठीतील दलित आणि ग्रामीण साहित्यप्रवाहांतील साहित्यकृतींत येणाऱ्या शब्दांचा कोश (तीन भागांत) सिद्ध करून प्रकाशित केला आहे. पालघर जिल्ह्यातील बोलींचा भाषावैज्ञानिक अभ्यास आणि वऱ्हाडी बोलीतील शब्द आणि वाक्प्रचार ह्यांचे कोश संस्थेने तयार करवून घेतले आहेत.

या संदर्भात मराठीच्या बोलींचे सर्वेक्षण : प्रतिमांकन आणि आलेखन हा संस्थेचा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. भौगोलिक आणि सामाजिक स्तरांवर मराठी भाषेचे विविध भाषाभेद आढळतात. ह्या विविध भाषाभेदांना आपण मराठीच्या बोली असे संबोधत असतो. मराठी भाषेतील ह्या भौगोलिक आणि सामाजिक स्तरांवरच्या वैविध्याचे भाषावैज्ञानिक वर्णन करण्याच्या उद्देशाने राज्य मराठी विकास संस्था, मुंबई आणि डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ, पुणे ह्यांच्या संयुक्त विद्यमाने २०१७ ते २०२३ ह्या कालावधीत हा प्रकल्प राबविण्यात आला.

ह्या प्रकल्पांतर्गत गोळा करण्यात आलेली आणि निर्माण करण्यात आलेली सर्व सामग्री https://sdml.ac.in/mr ह्या स्वतंत्र संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. अभ्यासकांबरोबरच सामान्य माणसांनासुद्धा हा डिजिटल संग्रह मनोरंजक वाटेल.

**शासनव्यवहार आणि मराठी**

शासनव्यवहारात मराठीचा वापर होत असताना तो वापर क्लिष्ट अथवा बोजड आहे असे अनेकांचे म्हणणे असते. ह्यासंदर्भातील वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशासनिक कामकाजाची भाषा म्हणून मराठी भाषा कशी विकसित होत गेली. ह्या भाषेची वैशिष्ट्ये कोणती अशा प्रश्नांची सखोल चर्चा करून स्पष्टीकरणे देणारे प्रशासनिक मराठी भाषेचा विकास हे पुस्तक संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात आले आहे. तसेच मराठी लघुलेखनकोशही संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात आला आहे.

**व्यवहार आणि विद्याशाखा**

ह्याचबरोबर विविध विद्याशाखा आणि व्यवहार ह्यांत मराठी भाषेचा वापर सुकर व्हावा ह्या हेतूने त्या क्षेत्रांतील पारिभाषिक संज्ञा मराठीतही निर्माण करणारे काही प्रकल्प संस्थेद्वारे राबवण्यात आले.

यंत्रालयातील म्हणजे कारखान्यातील विविध यंत्रे आणि यंत्रणा ह्यांची माहिती मराठीत देणारा शं. गो. भिडे ह्यांचा यंत्रालयाचा ज्ञानकोश, दत्ताजीराव कदम टेक्स्टाइल इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने तयार करण्यात आलेला अनेकखंडी वस्त्रनिर्मिती माहितीकोश (खंड १ ते ५ व ७ प्रकाशित) ही संस्थेची महत्त्वाची प्रकाशने आहेत.

**मराठी आणि तंत्रज्ञान**

आधुनिक काळाची पावले ओळखून संगणकीय व्यवहारात मराठीचा वापर सुकर करण्यासाठी यशोमुद्रा आणि यशोवेणू ह्या मराठी टंकांची (फॉँटची) निर्मिती संस्थेने केली आहे. तसेच हे टंक मुक्त (फ्री ॲण्ड ओपन सोर्स) परवान्यांतर्गत उपलब्ध करून दिले आहेत. ह्याचबरोबर नागरिकांना मराठीत संगणकावर व्यवहार करणे सुलभ व्हावे ह्यासाठी संस्था युनिकोड संकेतप्रणाली वापरून मराठीत कसे लिहायचे ह्यासंदर्भातील कार्यशाळा आयोजित करत आली आहे. तसेच मराठी विकिपीडियाविषयी जागृती करणाऱ्या कार्यशाळा आणि लाटेक् (LaTeX) ह्या आज्ञावलीचा वापर मराठी अक्षरजुळणीसाठी कसा करावा हे शिकवणाऱ्या कार्यशाळांचेही आयोजन संस्थेद्वारे करण्यात येत असते.

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वाचनचळवळ समृद्ध करण्यासाठी तसेच मराठीचा प्रचार–प्रसार करण्यासाठी मराठी भाषेचे अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी ह्यांच्यासाठी उपयुक्त अशी दुर्मिळ ग्रंथसंपदा आणि नियतकालिके, इ–बुक्स, श्राव्य पुस्तके राज्य मराठी विकास संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. तंत्रज्ञानामुळे ही सर्व सामग्री राज्यासोबतच भारतभर आणि जगभरातील कानाकोपऱ्यात आता उपलब्ध झाली आहे.

संस्थेद्वारे अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून संस्थेने मराठीतील उत्तमोत्तम साहित्य श्राव्य पुस्तकांच्या स्वरूपात जतन करून विनामूल्य उपलब्ध करून दिले आहे. त्यात दासबोध, ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त कवी कुसुमाग्रज आणि विंदा करंदीकर यांच्या कविता तसेच महाराष्ट्राचे पहिले मुख्यंत्री ना. यशवंतरावजी चव्हाण यांचे कृष्णाकाठ हे आत्मचरित्र अशा साहित्याचा समावेश आहे. नुकत्याच पार पडलेल्या विश्व मराठी संमेलनात मराठी भाषेचे देशिकार लेणे म्हणून विख्यात अशा ज्ञानेश्वरीचे श्राव्य पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. त्याला अल्पावधीतच जगभरातून उत्तम प्रतिसाद लाभला आहे. https://rmvs.marathi.gov.in/ (क्रमशः)

**–डॉ. शामकांत देवरे, संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई**

# पनवेल मनपा स्वच्छतादूतांची क्रिकेट स्पर्धा

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका आरोग्य विभागाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छतादूत चषक २०२५ क्रिकेट स्पर्धेत अतिक्रमण नियंत्रण ग्रुप या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

पनवेल महापालिका आरोग्य विभागाच्या माध्यमातून मानसरोवर रेल्वेस्थानकाजवळ जुई गावातील मैदानावर स्वच्छतादूत चषक २०२५ या एकदिवसीय टेनिस क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत मोरया इलेव्हन संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.



बक्षीस वितरण समारंभाला आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, युवा नेते हॅप्पी सिंग, महादेव वाघमारे इतर पदाधिकारी, कर्मचारी आणि क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनोगत व्यक्त करताना स्वच्छतादूत हे वर्षाचे ३६५ दिवस काम करून महापलिका क्षेत्रातील नागरिकांना सेवा देत असतात. त्यामुळे त्यांनी कामाबरोबरच आपल्या आरोग्याचीही काळजी घेणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन केले.

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा क्रीडा मेळा उत्साहात

## मान्यवरांची लाभली उपस्थिती

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा पहिला वार्षिक क्रीडा मेळा रविवारी (दि. १६) रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे झाला.

क्रीडा मेळ्याचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संचालक अमोघ ठाकूर यांच्या हस्ते क्रीडा ध्वज फडकावून करण्यात आली. त्यानंतर मशाल प्रज्वलन व शपथविधी सोहळा झाला. या वेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, आरटीपीएस स्कूलचे चेअरमन भार्गव ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, शालेय समिती सदस्य जयवंत देशमुख, वसंत पाटील, विश्वनाथ कोळी, दर्शन ठाकूर, अर्चना ठाकूर, मीनाक्षी पाटील, राधा ठाकूर तसेच डायरेक्टर प्राचार्य राज



अलोनी, एमएनएम विद्यालय व टीएनजी ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य प्रणिता गोळे आदी उपस्थित होते.

क्रीडा मेळयादरम्यान विद्यार्थ्यांनी कराटे, पिरॅमिड्स, प्री-प्रायमरी मास ड्रिल आणि मार्च पास्ट सादर केले. बेस्ट हाऊस ट्रॉफी ग्रीन हाऊसने पटकाविली. पालकांची शर्यतही रंगली. मुख्याध्यापिका चश्मिंदर बक्षी यांनी मान्यवरांसह पालकांचे आभार मानले व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.







पनवेल : आयटीएम बिझनेस स्कूलच्या वतीने वेलनेस रन ३.० ही आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत खारघर येथे झाली. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, युवा नेता अमर उपाध्याय, आयटीएम कौशल्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जयवंत शेलार, प्रो कुलगुरू डॉ. लक्ष्मी मोहन, महाव्यवस्थापक प्रशासन निलेश राय, गहिनीनाथ नावडेकर आदी उपस्थित होते.



पनवेल : ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि.च्या सौजन्याने टीआयपीएल प्रीमियर लीग २०२५ या एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. टीआयपीएल कर्मचाऱ्यांकरिता शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीच्या मैदानात रंगलेल्या या स्पर्धेत १६ संघांचा सहभाग होता. पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या स्पर्धेला भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, अभिजित कडू, अरुण घरत, धनंजय करतुरी, एम.पी. त्यागी, भरणीकुमार चल्लागुल्ला, शशिकांत मुंबईकर, जगदीश घरत, अनिल देशमुख, अरुण नाईक आदी उपस्थित होते.

# आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील आई मरिआई मित्र मंडळ रोहिदासवाड्याच्या वतीने आमदार चषक २०२५ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन शनिवारी (दि. १५) करण्यात आले होते. महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले.

एमएसईबी कार्यालयाच्या मागे असलेल्या मैदानात या १५ आणि १६ फेब्रुवारी या कालावधीत हे अंडरआर्म क्रिकेट सामने झाले. या स्पर्धेच्या उद्घाटनावेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक राजू सोनी, भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, भाजप प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, विनायक मुंबईकर, सुलोचना कल्याणकर, निलेश पाटील, समीप मोहोकर, उमेश भोस्कर, यशवंत जाधव यांच्यासह क्रीडाप्रेमी, खेळाडू उपस्थित होते. या वेळी परेश ठाकूर यांनी मैदानात फटकेबाजी केली.







पनवेल : टेन स्टार्स गव्हाण, गावदेवी क्रिकेट क्लब गव्हाण, यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था गव्हाण-शेलघर आणि महेश स्पोर्ट्स शेलघर यांच्या वतीने गव्हाण प्रीमियर लीग २०२५ या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन १४ ते १६ फेब्रुवारीदरम्यान गव्हाण गावातील मैदानात करण्यात आले होते. या स्पर्धेला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रविवारी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. त्यांचे आयोजकांनी स्वागत केले. या वेळी किरण देशमुख, अभिजित कडू, सी.एस. घरत, श्याम ठाकूर, विनायक कोळी, अनिकेत कोळी, परेश ठाकूर, जयंत म्हात्रे आदी उपस्थित होते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com